७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# नारी शक्ती विधेयकाला पाठिंबा द्यावा : नरेंद्र मोदी

**नई दिल्ली (दै. संध्या)**

आंतरराष्ट्रीय पातळीवर चाललेल्या अमेरिका-इराण युद्धामुळे सध्या देशात त्याचीच चर्चा चालू असली, तरी या चर्चेत एका महत्त्वाच्या मुद्द्यावर संसदेचं विशेष अधिवेशन पाचारण करण्यात आलं आहे. महिलांना ३३ टक्के राजकीय आरक्षण देण्यासंदर्भातल्या विधेयकावर या अधिवेशनात चर्चा होऊन ते संमत करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जाणार आहेत. तीन दिवसांच्या अधिवेशनात या विधेयकावरील चर्चेसाठी १८ तासांचा अवधी देण्यात आला आहे. आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देण्यासंदर्भातील तरतुदीचा जोरकसपणे पुरस्कार करतानाच विरोधकांवर खोचक शब्दांत टीका केली.



महिलांसाठी आरक्षणाबाबत आधी जनगणना, त्यानुसार २०२७ मध्ये मतदारसंघ पुनर्रचना व त्यानंतर महिलांसाठी आरक्षण लागू करण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल, असं मानलं जात होतं. मात्र, त्याआधीच महिला आरक्षणाबाबतचा मुद्दा मान्य करून ते २०२९ च्या निवडणुकीपासूनच लागू करण्याचा प्रयत्न या अधिवेशनाच्या माध्यमातून सरकारकडून केला जात आहे. या प्रस्तावाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षाच्या सदस्यांवर नरेंद्र मोदींनी यावेळी टीका केली.

"जेव्हा ३०-३५ वर्षांपूर्वी महिला आरक्षणाची गरज निर्माण झाली, तेव्हाच ते लागू केलं गेलं असतं आणि वेळेनुसार त्यात सुधारणा झाल्या असत्या तर ते योग्य ठरलं असतं. पण आता आपण सर्व खासदारांनी या महत्त्वपूर्ण संधीला दवडता कामा नये. आपण देशाला नवी दिशा देत आहोत. या विचारमंथनातून जे अमृत निघेल, ते देशाच्या राजकारणाचं स्वरूप ठरवणार आहेच, पण ते देशाची पुढची दिशा ठरवणार आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

यांआधी जेव्हा जेव्हा महिला आरक्षणाची चर्चा झाली, तेव्हा त्याला विरोध करणाऱ्यांना त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये महिला मतदारांनी धडा शिकवल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. "महिला आरक्षणाला आपण आधीच खूप उशीर केला आहे. जे आज राजकारण करतायत, त्यांना मी एक मित्र म्हणून सल्ला देऊ इच्छितो. आपल्या देशात जेव्हा जेव्हा महिला आरक्षणाची चर्चा झाली आणि त्यानंतर जेव्हा जेव्हा निवडणुका आल्या, त्यात आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना देशातल्या महिलांनी माफ केलेलं नाही. त्यांची अवस्था वाईट केली आहे", असं मोदी म्हणाले.

"आजही मी म्हणतो आपण सगळे सोबत आलो, तर त्याचं श्रेय कुणाही एकाला मिळणार नाही. हा निर्णय देशाच्या लोकशाहीच्या बाजूने होईल. त्याचं श्रेय आपल्या सगळ्यांना मिळू शकतं.

फक्त मी किंवा सरकारला नाही. ज्यांना यात राजकारण दिसतंय, त्यांनी गेल्या ३० वर्षांत आपण काय केलं, ते पाहून घ्यावं. आज सोबत येण्यात त्यांचा फायदाच आहे. या प्रकाराला राजकीय रंग देण्याची गरज नाही", अशा शब्दांत मोदींनी विरोधकांना खोचक सल्ला दिला. "जे आज या विधेयकाला विरोध करतील, त्यांना दीर्घकाळ त्याची किंमत चुकवावी लागेल", असा इशारादेखील पंतप्रधानांनी दिला.

केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांनी नारी शक्ती वंदन विधेयकावर मत मांडले. आजचा दिवस हा महिलांसाठी महत्त्वपूर्ण आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून महिला आरक्षणाची मागणी होत होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महिला आरक्षण देण्याचा हा प्रयत्न आहे.

विधेयक मंजूरीनंतर महिलांचा टक्का वाढेल. विरोधकांना मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाची कोणतीही अडचण नाही. पण महिला विधेयकावरून त्यांचा विरोध सुरू आहे. काँग्रेससाठी केवळ एकच महिला महत्त्वाची आहे.

### "मला याचं श्रेय नको, तुम्हीच घ्या श्रेय"

दरम्यान, सरकारला या विधेयकाचं श्रेय मिळेल म्हणून विरोधक याला विरोध करत असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यावेळी केला. "जर विरोधकांनी या विधेयकाला विरोध केला तर याचा लाभ मला होणार हे खरं आहे. पण विरोधक सोबत आले तर सगळ्यांचा फायदा होईल. आम्हाला याचं श्रेय नकोय. हे विधेयक पारित झाल्यावर उद्या मी सगळ्यांचे धन्यवाद करेन. सरकारी खर्चातून मी सगळ्यांचे फोटोही छापून देईन. तुम्ही घ्या श्रेय", असं मोदी यावेळी विरोधकांना उद्देशून म्हणाले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## म्हाडा घोटाळा; एसआयटी चौकशी सुरु
### महिनाभरात अहवाल सादर होणार

**नाशिक (दै. संध्या)**

नाशिक : म्हाडा घोटाळा प्रकरणी एसआयटी चौकशीला प्रारंभ झाला असून, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीमार्फत या प्रकरणाच्या कागदपत्रांची तपासणी सुरू झाली आहे. येत्या महिनाभरात चौकशी अहवाल राज्य शासनाला सादर केला जाणार असल्याचे वृत्त आहे.

महापालिका हद्दीतील एक एकर पुढील भूखंडावर आर्थिक दुर्बल घटकांसाठी २० टक्के राखीव सदनिकेच्या नियमातून पळवाट काढण्यासाठी बिल्डरांकडून बनावट कागदपत्रे सादर करून सातबाऱ्याचे तुकडे पाडून १५० कोटींचा म्हाडा घरकुल घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. म्हाडा, महसूल, महापालिका, भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी आणि बड्या बिल्डरांच्या संगनमताने झालेल्या या घोटाळ्यामुळे जवळपास दीड हजार गोरगरिबांना आपल्या हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागले आहे.

विधिमंडळात यासंदर्भात प्रश्न उपस्थित झाल्यानंतर भूमी अभिलेख विभागाने सरकारवाडा पोलिसांत १९७ बिल्डर विकासकावर गुन्हे दाखल केले आहेत. त्यानंतर महापालिकेनेदेखील १०८ पैकी घोटाळा झालेल्या ४९ प्रकरणांत सहभागी असलेल्या बिल्डरांसह १९७ जणांना मंजूर लेआउटसह परवाना रद्द का करू नये अशा नोटिसा बजावल्या आहेत. तसेच या बिल्डरांची नगररचना उपसंचालक रितेश चव्हाण यांच्या उपस्थितीत गेल्या शुक्रवार (दि.१०) पासून सुनावणीदेखील सुरू झाली आहे.

दरम्यान, राज्य सरकारने विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी नियुक्त केली आहे. या एसआयटीची पहिली बैठक डॉ. गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

समिती सदस्यांनी समितीचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच बैठकीत म्हाडा, महसूल, भूमी अभिलेख विभागाकडील कागदपत्रांची छाननी करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीच्या अहवालाचीही माहिती या बैठकीत घेण्यात आली. महापालिकेने मंजूर केलेले लेआउट, दिलेल्या बांधकाम परवानग्याही तपासल्या जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## हे 'नारी शक्ती' नव्हे तर 'भाजप शक्ती' बिल
### महिला आरक्षणाला विरोध नाही, पण मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या 'मनमानी'ला विरोध-राऊत

**मुंबई (दै. संध्या)**

महिला आरक्षणाला विरोधी पक्षांचा विरोध नाही, पण हे बिल पहिलेच मंजूर झाले आहे. महिला आरक्षणाला विरोध नाही, पण मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या 'मनमानी'ला विरोध आहे आणि राहणार, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. सरकारने विरोधकांशी चर्चा करायला हवी होती, मसुदा समोर आल्यावर काय चर्चा करणार? आठ दिवसांनी जर बिलावर चर्चा झाली तर काय मोठा फरक पडणार आहे? एवढी कसली घाई झाली आहे? असा सवाल राऊत यांनी केला आहे.



संजय राऊत म्हणाले की, आम्ही मतदान करत नारी शक्ती विधेयकाला विरोध करत हे बिल पाडणार आहोत. 364 मते असल्याशिवाय हे मंजूर होणार नाही. सरकारकडे 292 मते आहेत, ते जास्तीत जास्त 300 होऊ शकतो.

पण आमच्याकडे मोठा आकडा आहे, हे बिल मंजूर होऊ देणार नाही. बिलाला विरोध म्हणून सभा त्याग करणार नाही. सरकारला मदत करणारे देशाचे दुश्मन असतील.

**2023 मध्येच बिल मंजूर**

संजय राऊत म्हणाले की, नारी शक्ती हे बिल 2023 मध्ये मंजूर झालेले आहे. केंद्र सरकार देशातील नागरिकांना फसवत आहे. त्या विधेयकामध्ये जनगणनेसंदर्भात काही चर्चा होत्या. हे बिल ऐतिहासिक आहे असे केंद्र सरकार म्हणत आहे. सध्या जितके खासदार आहेत त्यामध्ये महिलांना आरक्षण द्या, नवे मतदारसंघ निर्माण करत तुम्हाला हे बिल लादायचे आहे, सर्वांचा त्याला विरोध आहे. त्यांना हे बिल मंजूर करण्यासाठी बहुमत मिळणार नाही. नारी शक्ती बिल नसून केवळ भाजपा शक्ती बिल आहे. हे बिल आम्ही संसदेत मंजूर होऊ देणार नाही.

**उद्धव ठाकरे ममता बॅनर्जी यांच्याशी चर्चा करणार**

संजय राऊत म्हणाले की, 5 राज्यात निवडणुका असताना हे बिल मंजुरीसाठी आणायची सरकारला काही गरज नव्हती. जर तुम्हाला ऐतिहासिक बिल मंजूर करायची आहे, लोकशाही मजबूत करायची आहे.

■ नारी शक्ती विधेयकाला विरोध करत हे बिल पाडणार

■ महिलांचा लोकशाहीत सहभाग वाढवायचा आहे

महिलांचा लोकशाहीत सहभाग वाढवायचा आहे. पण अनेक खासदार सध्या प्रचारात व्यस्त आहेत. त्यांना तुम्ही मतदानापासून रोखत बिल मंजूर करूण घेऊ असा सरकारचा प्रयत्न आहे. केरळमधील सर्व खासदार उपस्थित राहणार आहेत, पश्चिम बंगालमधील सर्व खासदारांना आणायचा प्रयत्न आहे. तर द्रमुकचे सर्व खासदारही अधिवेशनासाठी उपस्थित राहणार आहेत. उद्धव ठाकरे आणि ममता बॅनर्जी यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. ते ममता बॅनर्जी यांच्याशी चर्चा करणार आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## बच्चू कडूंची दमदार झेप: राजकारणातून थेट हिमालयात

मुंबई (दै. संध्या) :महाराष्ट्राच्या राजकारणात आक्रमक आणि जनतेसाठी झटणारे नेते म्हणून ओळख असलेले बच्चू कडू यांनी यावेळी एक वेगळाच पराक्रम गाजवला आहे. 13 एप्रिल रोजी त्यांनी जगातील सर्वात उंच शिखर असलेल्या एव्हरेस्टच्या बेस कॅम्पपर्यंत यशस्वी मजल मारत एक नवा विक्रम नोंदवला. 5364 मीटर म्हणजेच 17,594 फूट उंचीवर पोहोचत त्यांनी आपल्या जिद्दीचा आणि चिकाटीचा ठसा उमटवला. विशेष म्हणजे, हा प्रवास त्यांनी कोणत्याही विशेष सुविधा न घेता पूर्ण केला.

हा संपूर्ण ट्रेक अत्यंत खडतर मानला जातो. सलग आठ दिवस दररोज 12 ते 14 किलोमीटर पायी चालत, डोंगर-दऱ्यांमधून चढाई करत हा प्रवास पार करावा लागतो. जसजसे उंची वाढत जाते, तसतसे वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत जाते. एव्हरेस्ट बेस कॅम्पवर तर फक्त 45 टक्के ऑक्सिजन उपलब्ध असतो. त्यामुळे श्वास घेणेही कठीण होते. याशिवाय उणे 15 अंश सेल्सियसपर्यंत पोहोचणारी थंडी ही आणखी एक मोठी परीक्षा होती.

**दै. संध्या अँकर**

### इतर कोणत्याही प्रस्तावावर चर्चा आवश्यक : सपकाळ

## उद्धव ठाकरे विधान परिषदेवर जात असतील तरच काँग्रेसचा पाठिंबा

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. 9 जागांसाठी नियमित निवडणूक आणि एका जागेसाठी पोटनिवडणूक अशी एकूण 10 जागांसाठी 12 मे रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने यासाठी संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला असून त्याच दिवशी संध्याकाळी निकालही घोषित केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत कोणाला उमेदवारी मिळणार, याबाबत चर्चा रंगू लागली आहे.

याच दरम्यान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महत्त्वाचे वक्तव्य करत राजकीय चर्चांना उधाण आणले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, जर उद्धव ठाकरे विधान परिषदेवर जाण्याचा निर्णय घेत असतील तर काँग्रेस त्यांना पाठिंबा देण्यास तयार आहे. मात्र, इतर कोणत्याही प्रस्तावावर चर्चा आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे आघाडीतील जागावाटपावरून मतभेद उघड होण्याची चिन्हे दिसत आहेत.



### संपूर्ण प्रक्रिया 13 मेपर्यंत पूर्ण

निवडणुकीचा कार्यक्रमही स्पष्ट करण्यात आला आहे. 23 एप्रिल रोजी अधिसूचना जारी होणार असून 30 एप्रिल ही उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख असेल. 2 मे रोजी अर्जांची छाननी होईल, तर 4 मेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. 12 मे रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत मतदान होईल आणि त्याच दिवशी सायंकाळी 5 वाजता मतमोजणी होणार आहे. संपूर्ण प्रक्रिया 13 मेपर्यंत पूर्ण केली जाणार असून या निवडणुकीतून राज्यातील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सपकाळ यांनी पुढे बोलताना राजीव सातव यांच्या जागेचा मुद्दाही उपस्थित केला. ही जागा काँग्रेसची असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी राजकीय संस्कृतीबद्दल केलेल्या विधानाची आठवण करून देत, आता तीच संस्कृती दाखवत ही जागा काँग्रेसला देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

दरम्यान, विधान परिषद निवडणुकीतील गणित पाहता सत्ताधारी महायुती मजबूत स्थितीत असल्याचे दिसते. विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपकडे 131, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे 57 आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे 40 आमदार आहेत. त्यामुळे महायुतीचे किमान 8 उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. दुसरीकडे महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ सुमारे 46 असल्याने त्यांचा केवळ एक उमेदवार निश्चित विजयी होण्याची शक्यता आहे.

विधान परिषद निवडणुकीत एका उमेदवाराला विजयी होण्यासाठी 28 मतांचा कोटा आवश्यक असतो. त्यामुळे दुसऱ्या जागेसाठी महाविकास आघाडीला अतिरिक्त 10 मतांची गरज भासणार आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीत ही मतांची जुळवाजुळव करणे कठीण मानले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीत राजकीय समीकरणे कशी बदलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बँक फसवणूक प्रकरणात अनिल अंबानींना दिलासा नाही

**मुंबई (दै. संध्या)**

रिलायन्स ग्रुपचे चेअरमन अनिल अंबानी यांच्या अडचणी कमी होण्याचे नाव घेत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने अंबानींच्या त्या याचिकेवर दिलासा देण्यास नकार दिला आहे, ज्यात त्यांनी बॉम्बे उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाला आव्हान दिले होते, जो बँकांना त्यांच्या कर्ज खात्याला 'फ्रॉड' (फसवणूक) घोषित करण्याची परवानगी देतो.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाचा आदेश या प्रकरणात प्रलंबित असलेल्या दिवाणी दाव्याच्या आड येणार नाही.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

खरं तर, इंडियन ओव्हरसीज बँक आणि इतर दोन बँकांनी अनिल अंबानींच्या कर्ज खात्याला 'फ्रॉड' म्हणून वर्गीकृत करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. याविरोधात अंबानींनी बॉम्बे उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

डिसेंबर 2023 मध्ये, उच्च न्यायालयाच्या एकल न्यायमूर्ती खंडपीठाने अंबानींना अंतरिम दिलासा देत बँकांच्या कारवाईला स्थगिती दिली होती. मात्र, नंतर उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने ही स्थगिती उठवली आणि बँकांना पुढे जाण्याची परवानगी दिली. याच निर्णयाला अंबानींनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.



**सेटलमेंटच्या इच्छेवर न्यायालयाची टिप्पणी**

सुनावणीदरम्यान, अनिल अंबानींच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की त्यांना बँकांसोबत हे प्रकरण मिटवायचे आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही टिप्पणी करण्यास नकार दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की सेटलमेंटच्या विषयावर त्यांचे कोणतेही मत नाही, हा बँका आणि कर्जदार यांच्यातील मामला आहे.

**अंबानींसाठी अडचणी का वाढू शकतात?**

जर बँकांनी एखाद्या खात्याला 'फसवणूक' (फ्रॉड) घोषित केले, तर त्याचे गंभीर परिणाम होतात. आरबीआयच्या नियमांनुसार, फसवणूक घोषित झाल्यानंतर संबंधित व्यक्ती किंवा कंपनीला भविष्यात बँकिंग प्रणालीतून कोणत्याही प्रकारचे कर्ज मिळण्यास खूप अडचणी येतात. यासोबतच, सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणाही या प्रकरणात आपली चौकशी सुरू करू शकतात.

# संपादकीय

# ‘उडता महाराष्ट्र’? तरुणाई ड्रग्सच्या विळख्यात...

मुंबईसारख्या शहरांसह ग्रामीण भागात ड्रग्जच्या गंभीर प्रश्नाकडे सरकार आणि पोलिसांचे लक्ष जाण्यासाठी दोन तरुण मुलांचा मृत्यू व्हावा लागला हे दुर्दैवी म्हणावे लागेल. मुंबईतील एका म्युझिक कॉन्सर्टमध्ये ड्रग्जचे अतिसेवन केल्यामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाला आणि राज्यातील अंमली पदार्थांच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले. मुंबईसारख्या शहरात एका कार्यक्रमात हजारो तरुण-तरुणी एकत्र येतात, या कार्यक्रमात ड्रग्जचे खुलेआम सेवन होते आणि त्याची पुसटशी कल्पना पोलिसांना नसते यावर कोण विश्वास ठेवेल? पूर्वी मेट्रो शहरांमध्ये सहज उपलब्ध होणाऱ्या ड्रग्जचे लोण आता मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या महानगरांसह लहान शहरे आणि ग्रामीण भागात पसरले आहे. नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्वात जास्त प्रश्न ड्रग्जच्या सहज उपलब्धतेवर होते. ड्रग्जची सहज उपलब्धता आणि त्यामुळे बरबाद होणारी तरुण पिढी याबाबत शहरासह ग्रामीण भागातील आमदारांनीही प्रश्न उपस्थित करून या गंभीर प्रश्नाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. खरे तर ६ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या विधानसभा क्षेत्रातील एका आमदाराला ड्रग्जचा सुळसुळाट दिसतो, मग त्या भागातील शेकडो पोलिसांच्या नजरेतून ही बाब कशी सुटते? आपल्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोणते काळेधंदे सुरू आहेत याची पोलिसांना अनेकदा कल्पना असते, मात्र हप्ते घेऊन त्याकडे सहज दुर्लक्ष केले जाते. ड्रग्जमुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे याचे गांभीर्यही या हप्ते वसुली करणाऱ्यांना नसते. ड्रगमाफियांची शिकार असतात ती शाळकरी आणि महाविद्यालयीन मुले, त्यामुळे ड्रग्जची विक्री ही शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात होत असते, मात्र पोलिस त्याकडे कानाडोळा करतात आणि त्यातूनच शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी ड्रग्ज सेवनाच्या आहारी जात आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार महाराष्ट्राची वाटचाल ‘उडता पंजाब’च्या दिशेने सुरू असल्याचे दिसून येते. दहा वर्षांपूर्वी पंजाबमध्ये ड्रग्जच्या तस्करीची वर्षाला आठ ते दहा हजार प्रकरणे नोंदवली जात होती. महाराष्ट्रात सध्या हा आकडा तीन हजारच्या घरात आहे. यातून मुंबईसह पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भही सुटलेला नाही. ड्रग्जची तस्करी पूर्वी विविध देशातून हवाई अथवा समुद्रमार्गे होत होती, ही तस्करी थांबलेली नाहीच, उलट आता राज्यातच ड्रग्जचे कारखाने सुरू झाल्याने त्याची सहज उपलब्धता वाढली आहे. एखाद्या भागात ड्रग्जचा मोठा कारखाना सहज उभा राहतो, त्यातून ‘एमडी’सारख्या घातक ड्रग्जची निर्मिती होते आणि पोलिस, प्रशासन त्यावर सोयीनुसार कारवाई करते, असे सध्या महाराष्ट्रातील चित्र आहे. साताऱ्यात एका शेतात ड्रग्जचा कारखाना सुरू असतो, त्याची भनक सातारा पोलिसांना नसते, मात्र मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे पथक तिथे जाऊन कारवाई करते, हे कशाचे द्योतक? ललित पाटील प्रकरण हे ड्रगमाफिया आणि पोलिसांचे लागेबांधे कसे होते याचे ज्वलंत आणि ताजे उदाहरण आहे. ललित पाटील नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात ड्रग्जची निर्मिती करत होता आणि त्याची साठवणूक आणि वितरण पुण्यातून होत होते. या ड्रगमाफियाला पोलिस आणि ससून रुग्णालयातून मदत होत होती. हे सगळे प्रकरण समोर आल्यानंतर दोन पोलिसांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले तर काहींना निलंबित करण्यात आले. त्याला अटक झाली तेव्हा तो ससून रुग्णालयात दाखल झाला, तिथे त्याला व्हीआयपी ट्रीटमेंट देण्यात आली आणि गंभीर बाब म्हणजे तिथूनही तो ड्रग्ज रॅकेट चालवत होता. म्हणजे ललित पाटीलची पोहच कुठपर्यंत असेल याची कल्पना केलेली बरी. काही वर्षांपूर्वी नाशिकच्या एका आमदाराने एमडी ड्रग विकत घेऊन ते थेट विधानपरिषदेत सादर केले होते. एका शाळेच्या बाहेर कशा पद्धतीने ड्रग विक्री सुरू आहे त्याचे फोटोही दिले होते. मात्र सरकारने कारवाई करण्याची केवळ घोषणा केली, प्रत्यक्ष कारवाई मात्र झाली नाही.

## संस्कृत सुभाषित

वैष्णव जन तो तेणे कहिये जो परपीडा जाने रे।

अर्थ – जे अशा उच्च कोटीला पोहोचलेले असतात, त्यांना स्वार्थ उरत नाही. जनाच्या कल्याणासाठीच अशा विभूती अवतरतात. त्यांना मग ती दु:ख निवारणाचीच चिंता उरते.

## गुरु वचन

### दृढ संकल्पात सर्व शक्य

आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक असे विकासाचे चार प्रकार आहेत. निरंतर आध्यात्मिकतेकडे अग्रेसर राहण्यातच मानव–जीवनाची सार्थकता आहे. यासाठी मानवी मनोवृत्तीचे निर्मलीकरण व दिव्यीकरण आवश्यक आहे. सतत उपासनेमुळेच हे शक्य आहे. उपासनामुळे आत्मबळ मिळते. दैवी दयाचा अनुभव उपासनानेच होतो. उपासनाचे २ प्रकार मानले गेले आहेत –वैधी तथा नामरूप स्मरणात्मक. वैधी उपासना दुष्कर आहे. ती जटील विधि–विधानांच्या मालिकेत अडकली आहे. याउलट नामरूप स्मरणात्मक उपासना कुठलीही औपचारिकताची अपेक्षा किंवा नियम–उपनियमाने बांधिल नाही. याद्वारे सुख व दु:ख, दोन्ही एकरुप होण्याची शक्ती मिळते, हृदय शांत होते, मनाला आराम मिळतो, बुद्धीचे तेज वाढते व अंत:करण स्वच्छ होते. नामस्मरणाने साधक सौरमंडळ भेदून ब्रह्मांडाचा अधिकारी बनतो म्हणून कबीर म्हणतात की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत निर्भय होऊन ईश्वराचे नामस्मरण करत राहिले पाहिजे. तेलाप्रमाणे आयुष्य संपल्यावर शरीर रूपी ज्योत बिझते. साधना व साध्य दोन वेगवेळ्या वस्तू नाहीत. त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. एकाच्या अभावात दुसरे मिळू शकत नाही. लक्ष्य विदित झाल्यावरच साधनाचे स्वरूप निर्धारित होऊ शकते. शास्त्र सांगते की, जर तुम्हाला देवत्व मिळाले तर पुन्हा या जगात येऊ शकणार नाही. जिज्ञासुच्या रुपात आपली बुद्धीमत्ता यातच आहे की, प्रथम सर्व इंद्रियांना मनात निरुद्ध करावे, मनाल ज्ञान–स्वरूप बुद्धीत विलीन करावे, ज्ञानस्वरूप बुद्धीला महान आत्म्यात विलीन करावे व यास शांत स्वरूप परमात्म्यात विलीन करावे. दृढ संकल्पानेच हे शक्य आहे. जेव्हा संकल्प दृढ असतो, ईश्वर चरणी अखंड विश्वास असतो तेव्हा उद्देश साध्य होतो. संकल्प शुद्धी व दृढतेने ईश्वरास सुद्धा तासनतास नाचवले आहे. वास्तवात दृढ संकल्प एका गडाप्रमाणे आहे, जो भयंकर प्रलोभनांपासून आपणास वाचवतो.

## उपदेशकथा

### निरपराधित्व आणि शत्रुत्व

एका राज्यात भारतद्वाज पक्षी राहात होता, तो नेहमी सगळीकडे फिरत असत, त्या राज्यात पारध्यांचे प्रमाण भरपूर होते ते नेहमीच पक्षी पकडत असत, एक भारद्वाज पक्षी एका पारध्याच्या जाळ्यात अडकला.

तो पारध्याला म्हणाला, ‘दादा, मी तुझा असा कोणता अपराध केला आहे म्हणून तू मला मारतोस? मी तुझं सोनं चोरलं नाही तर धान्याचे चार दाणे मात्र घेतले. पण पारध्याने त्याच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्याची मान मुरगाळली व त्याला आपल्या टोपलीत टाकले.

कथा उपदेश : एकदा शत्रूच्या हाती सापडल्यानंतर आपले कितीही निरपराधित्व सिद्ध केले तरी उपयोग होत नाही.

## पंचांग

१७ एप्रिल २०२६
शुक्रवार
विक्रम संवत्– २०८२
चैत्रशके संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– चैत्र
ऋतु– सौर वसंत
कृष्ण पक्ष
तिथि:अमावस्या
१७:२१:३३
नक्षत्र:रेवती १२:०२:०३
योग:वैधृति ०७:२१:२३
योग:विष्कुम्भ
२७:४४:५७+
करण:चतुष्पाद
०६:४९:४७
करण:नाग १७:२१:३३
करण:किस्तुघ्न
२७:४८:०९+
सूर्य:मेष
चन्द्र:मेष१२:०२:०३
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – शव्वाल
तारीख – २८
विशेष
दर्श अमावास्या
नारायणस्वामी
पुण्यतिथी – नृसिंहवाडी
अमावास्या समाप्ती
सायं ५.२२

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १२१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 6 | | 9 | 8 | 3 | | |
| | | 7 | | | 4 | 5 | 2 | |
| | | 5 | 7 | | | 6 | | 4 |
| 7 | 4 | 8 | | 3 | | | | 6 |
| | | | | | | | | |
| 2 | | | | 1 | | 7 | 4 | 3 |
| 8 | | 3 | | | 7 | 4 | | |
| | 5 | 2 | 6 | | | 8 | | |
| | | 4 | 3 | 8 | | 2 | 1 | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोडरबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १२० चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 5 | 2 | 9 | 1 | 3 | 6 | 7 | 8 |
| 9 | 6 | 1 | 2 | 7 | 8 | 5 | 3 | 4 |
| 8 | 7 | 3 | 6 | 5 | 4 | 9 | 1 | 2 |
| 7 | 1 | 9 | 4 | 2 | 5 | 3 | 8 | 6 |
| 5 | 8 | 6 | 3 | 9 | 1 | 4 | 2 | 7 |
| 3 | 2 | 4 | 8 | 6 | 7 | 1 | 5 | 9 |
| 1 | 4 | 5 | 7 | 8 | 9 | 2 | 6 | 3 |
| 6 | 3 | 7 | 1 | 4 | 2 | 8 | 9 | 5 |
| 2 | 9 | 8 | 5 | 3 | 6 | 7 | 4 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७११ – चार्लेस पाचवा हब्सबर्ग ऑस्ट्रीयाचा राजेपदी.
- १८७५ – सर नेवीली केंबरलेन यांनी स्नुकर विकसित केले.
- १९४६ – फ्रान्सकडून सिरियाला स्वातंत्र्य घोषित करण्यात आले.

### राष्ट्रीय

- १९८३ – भारताच्या रोहिणी–डी–३ उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
- २००२ – स्वामी सच्चिदानंद यांना संयुक्त राष्ट्रसंघाचे युथांट शांततापदक.
- २००६ – आंध्र प्रदेशात वीज कोसळल्याने १६ जण ठार झाले.
- २००७ – जम्मूत बस दरीत कोसळल्याने १३ जण ठार झाले.

### जन्म

- १६७६ – स्वीडनचे राजा फ्रीड्रीक पहिला (वान हेसन कसेल) याचा जन्म.
- १८७० – अमेरिकी पत्रकार रे स्टनर्ड बेकर याचा जन्म.
- १९०४ – भारतीय कसोटी क्रिकेट संघाचा सलामी फलंदाज नऊमल जीओमल याचा जन्म.
- १९०६ – न्यु रोटरडम डेली या वृत्तपत्राचे मुख्य संपादक एम रुई याचा जन्म.
- १९१६ – जगातील पहिल्या महिला पंतप्रधान श्रीलंकेच्या सिरीमावो भंडारनायकेंचा जन्म.

### निधन

- ०८१८ – इटलीचा राजा ब्रनहर्ड पहिला याचे निधन.
- ०८५८ – इटालीयन पोप बेंडीकेट तिसरा याचे निधन.
- १९४६ – भारत सेवक समाजाचे संस्थापक–सदस्य श्रीनिवास शास्त्री यांचे निधन.
- १९९३ – तुर्कीचे राष्ट्रपती तुरगत ओझल याचे निधन.
- १९९७ – इस्त्राईलचे राष्ट्रपती चेम हरझोग याचे निधन.

## : SMS :

ya mere apane mu
ki shihahi hai
dil ke phaphole
jal uthe.
sine ke dag se.
is ghar ko aag lag gai
ghar ke chirag se.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७ | २६.३ |
| अहमदनगर | ३७.९ | २५.७ |
| अकोला | ३९.८ | २७.७ |
| अमरावती | ३९.९ | २८.१ |
| बीड | ४०.९ | २८.९ |
| भंडारा | ४१.८ | २७.५ |
| बुलढाणा | ३५.९ | २३ |
| चंद्रपूर | ४१.७ | २९.६ |
| चेन्नई | ४४.१ | २५.८ |
| नवी दिल्ली | ३६.१ | २५.१ |
| धुळे | ३८.८ | २६.७ |
| गोंदिया | ४०.२ | २६.६ |
| जळगाव | ३९.२ | २७.२ |
| कोल्हापूर | ३७.८ | २२.२ |
| लातूर | ३७.१ | २६.४ |
| मुंबई | ३८ | ३१.५ |
| नागपूर | ४०.७ | २७.४ |
| नांदेड | ३९.७ | २७.१ |
| नंदूरबार | ३६.२ | २६ |
| नाशिक | ३६.४ | २३.५ |
| पुणे | ३५ | २३.८ |
| पंढरपूर | ३९.३ | २६.७ |
| सातारा | ३८.२ | २३.१ |
| सांगली | ३९ | २४ |
| सोलापूर | ३९.७ | २७.६ |
| वर्धा | ४१.२ | २८.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर आपले काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर निर्णय घेताना मर्यादा पाळा. कामकाजात अजचणी आल्यामुळे मन दु:खी राहील. निष्कारण शंकेमुळे बेचैन रहाल.

**वृश्चिक :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा: पूर्व आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील. मुलांच्या प्रगतीमुळे आपण प्रसन्न रहाल.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व सकारात्मक वातावरण निर्माण होईल त्याचा फायदा घ्या. कामाचे समाधान मिळेल. बोलण्यावर नियंत्रण राखा.

**कर्क :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : उत्तर आत्मविश्वास असल्या कारणाने कोणत्याही कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. दुसऱ्यांचा सल्ला आपल्याकरिता फायदेशीर राहील.


**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. आपल्या कामाचे चिज होणार नाही. स्वत: आपल्या कामात उत्साह दाखवा.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी : शुभ दिशा: पश्चिम दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. एका योग्य समुहाशी संबध जुळण्याचा योग आहे.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील. स्पष्ट बोलण्यामुळे आपली विश्वासनियता वाढेल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १२१



**आडवे शब्द**

८. महिना
१०. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सागराला केलेली विनंती– ‘–– –– प्राण तळमळला’
१६. चोप
१७. पत्नी
१९. फालतू बकबक
२०. निरंतर
२२. मौज
२३. तांब्या
२४. प्रथा
२५. रानरेडा
२७. साठ मिनिटे
३०. रहस्यमय
३१. पांढरा
३३. स्त्री
३५. खोटारडा
३८. समजायला सेपे
४०. गंध
४१. स्वच्छता
४४. देव
४६. नाकातील अलंकार
४८. एक लवचिक पदार्थ
४९. दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा
५१. डाग
५३. अबोल्याची खूण
५५. दया
५७. बभ्रा, गाजावाजा
६०. दुखापत
६१. चरबी
६३. उन्हाची तलखी
६४. पर्वत
६५. मालदार
६६. निष्णात
६८. अभिनेता
७०. प्रपात
७१. अशुद्ध रक्तवाहिनी
७३. अतिशय कंजूष
७७. धांदल
७८. खग
८१. विश्वास
८२. रमलेला
८३. किरकोळ, नगण्य

**उभे शब्द**

१. सोन्याच्या रंगाचे
२. हनुमान
३. चित्रपट
४. ताकद
५. सरहद्द, वेस
६. देव
७. पाणी पिण्याचे भांडे
८. तपास
९. रियाझ
११. परातंत्र्य
१२. फरक
१३. गवत
१४. मिलाप, भेट
१५. सासरी होणारा छळ
१७. अफवा
१८. अमसुलाचे फळ
२०. पावा
२१. तमाशा
२६. डिंक
२८. संपूर्ण
२९. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ
३२. बदल, हलवाहलवी
३४. मासेमारीचे साधन
३६. गाठोडे, ३७. प्रवास
३८. पायऱ्या असलेली विहीर
३९. नौका, ४२. बहाणा
४३. दुबळा
४४. सोपे
४५. खाट
४७. शीण
५०. स्त्रीलिंगी लांब हात असलेला, श्रीरामाचे विशेषण
५२. शाहिरी काव्य
५४. गुडघ्यापर्यंत लांब हात असलेला, श्रीरामाचे विशेषण
५६. उपवासाचे तांदूळ
५८. आभाळाला भिडलेले, खूप उंच इमारत इ.
५९. भूत
६२. वंचित, मुकलेला
६३. रात्र
६५अ. पूजासामग्रीचे ताट
६७. ज्ञात
६९. स्नानाचे पात्र
७२. तांबडा
७३. थडगे
७४. दुष्ट बेत
७५. ढोंग
७६. बहुमानाचे संबोधन
७९. दूध
८०. सवलत

**जम्बो शब्दकोडे क्र. १२० चे उत्तर**

आडवे उत्तर : २.अस्त ३.राणा प्रताप सिंह ७.गर्व ८.अटकाव १०.तह ११.उडी १२.नीटनेटका १६.भाक १७.नभ १९.बटीक २०.पाककला २१.जरब २३.यकृत २४.माल २५.राणी २६.लगेच २८.सन ३०.गज ३२.रवी ३४.हिंदी महासागर ३८.मार्गदर्शक ४०.रांग ४१.सान ४२.नीर ४३.समता ४५.महाग ४६.वाणी ४७.मेथी ४९.सून ५०.नाट ५२.मेणा ५३.हय ५४.जलतरण ५६.शीर्ष ५७.तळ ५८.दहा ५९.हात ६०.टब ६१.वाट ६२.रदबदली ६४.लहान ६६.नार ६८.लग्न ६९.दाट ७०.धमनी ७१.नीज ७३.मया ७४.विकार ७६.कव ७९.मावशी ८२.रगड ८४.रसमलई ८७.आवड ८८.मुबलक ८९.फत्ते

उभे उत्तर : १.सुटसुटीत २.अवनी ४.प्रथा ५.पतकर ६.सिंह ७.गडी ९.अनेक ११.उभयचर १३.टपाल १४.टकळी १५.काला १६.भाजणी १८.पितर २२.बल २४.मानहानी २५.राजमाता २७.अहिंसा २८.सन २९.दंग ३१.सदरा ३३.वीरांगना ३५.दीनवाणा ३६.सारमेय ३७.रस ३९.कमनशीब ४४.महाल ४८.परत ५१.टवटवी ५२.मेहरबानी ५३.हळद ५४.जहाल ५५.तहान ५७.तबला ६०.टर ६३.लीलया ६५.हानिकारक ६६.नाटक ६७.सामसूम ७२.जमाव ७३.माशी ७५.रग ७७.वर ७८.रई ८०.वड ८१.आब ८३.डफ ८५.सध्या ८६.लक्ष्य

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे शहरात गुरुवारी पाणी येणार; टँकर चालकांच्या संपामुळे 'पाणीपुरवठा बंद' पुढे

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहर वाहतूक पोलिस आणि महापालिका प्रशासनाने टँकर चालकांवर काही कठोर भूमिका घेतली आहे. त्याविरोधात टँकर चालकांनी संप पुकारला आहे. या टँकर चालकांच्या संपासह काही तांत्रिक कारणांमुळे गुरुवार (दि. १६) रोजी पुणे महापालिकेने नियोजित पाणीपुरवठा बंद पुढे ढकलला आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी निवेदन जाहीर केले आहे. त्यामध्ये प्रस्तावित बंदाच्या पुढील तारखेची घोषणा लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी संभ्रमित न होता अधिकृत सूचनेकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, शहरातील पाणीपुरवठा पूर्ववत सुरू राहणार असून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे, असे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.



### मेट्रो ठेकेदाराचे 50 लाखांच्या खंडणीसाठी अपहरण

पुणे (दैनिक संध्या) : खडी क्रशर प्लांटसाठी जागा दाखवण्याची बतावणी करून मेट्रो ठेकेदाराचे ५० लाखांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी खराडी पोलिसांनी पाच जणांना अटक केली. या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी खडी क्रशर (स्टोन क्रशर) चालक आहेत. सागर दत्तात्रय झुरुंगे (वय ३९), विजय सुरेश वाळुंज (वय ३८), राजू विजयकुमार सहाणे (वय ३२), रुपेश शिवाजी गावडे (वय ३८, सर्व रा. लोणीकंद, पुणे - अहिल्यानगर रस्ता) आणि प्रकाश बाळासाहेब राऊत (वय ३४, रा. तुळापूर, ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहे. याबाबत मेट्रोतील ठेकेदाराने खराडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ४० वर्षीय ठेकेदार मूळ उत्तर प्रदेशातील कानपूरचे रहिवासी आहेत. सध्या ते गहुंजे भागात राहायला आहेत. ते रेल विकास निगम लिमिटेडच्या वतीने मेट्रो प्रकल्पात बांधकामाचे काम करतात. तक्रारदारांनी बांधकामासाठी आरोपी झुरुंगे यांच्याकडून वेळोवेळी खडी क्रशरचा माल घेतला आहे. खडी क्रशर व्यवसायासाठी जागा दाखवतो, असे सांगून आरोपींनी त्यांना मंगळवारी (दि. १४) खराडी आयटी पार्क परिसरात बोलावले. तेथील एका हॉटेलजवळ ते दुपारी बाराच्या सुमारास थांबले होते. आरोपींनी त्यांना जागा दाखविण्याचा बहाणा करून कारने एका ठिकाणी नेले. तेथे दुसऱ्या कारमधून काही आरोपी आले. आरोपींनी तक्रारदारांकडे ५० लाख रुपयांची खंडणी मागणी करून त्यांना मारहाण केली. तसेच पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर सायंकाळी साडेसातच्या सुमारास तक्रारदाराला खराडी परिसरात सोडून आरोपी पसार झाले. यानंतर तक्रारदारांच्या चालकाने झालेला संपूर्ण प्रकार पोलिसांना सांगितला. गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे आणि परिमंडळ सातचे उपायुक्त सोमय मुंडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. यानंतर पोलिसांनी पेरणे भागात नाकाबंदी लावून आरोपींना ताब्यात घेतले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक गोडसे पुढील तपास करत आहेत.



### पुण्यात पालखी मुक्काम हलविण्याचा प्रयत्न; नागरिकांमध्ये नाराजी

पुणे (दैनिक संध्या) : संत परंपरेतील पवित्र पालखी सोहळ्यात मागील सुमारे ३५० वर्षांपासून सुरू असलेला भवानी पेठ पालखी विठोबा मंदिर येथील मुक्काम हा परंपरेचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पुण्यातील मुक्काम स्थळात बदल करू नये अशी ठाम मागणी भाजपचे नगरसेवक विशाल धनवडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. भवानी पेठ पालखी विठोबा मंदिर येथील सुमारे ३५० वर्षांपासून सुरू असलेला पालखीचा मुक्काम हलविण्याचा प्रयत्न होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे निवडुंगा विठोबा देवस्थान संस्थानचे विश्वस्त आणि भाजपचे नगरसेवक विशाल धनवडे यांनी शिष्टमंडळासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. पालखी सोहळ्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, तसेच प्रशासनाच्या माध्यमातून योग्य त्या सुविधा आणि उपाययोजना करण्यात याव्यात, यासाठी विनंती करण्यात आली. तसेच भवानी पेठ येथील पारंपरिक मुक्काम हलवू नये, अशी ठाम मागणी करण्यात आली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत प्रशासनाला योग्य त्या सूचना देऊन आवश्यक सहकार्य करण्यात येईल ,असे आश्वासन दिले. पालखी काळात गैरसोय होते हे कारण सांगून पालखीतळ बदलणार असल्याचे सांगितले जात आहे . त्यामुळे ही गैरसोय पुणे महापालिका दुर करणार आहे. तसेच ३५० वर्षांची ही परंपरा खंडित होऊ देऊ नका व भवानी पेठ पालखी विठठल मंदिरातील पालखी मक्काम हलवू नका.संत परंपरा आणि भाविकांच्या श्रद्धेचा मान राखत हा ऐतिहासिक मुक्काम कायम ठेवला जावा, अशी अपेक्षा विशाल धनवडे यांनी व्यक्त केली.

# पुण्यात एमडी ड्रग्स तस्करी उघड; दोघांना अटक

## पुणे विमानतळ पोलिसांची मोठी कारवाई; एमडी अमली पदार्थासह दोघांना अटक, 26.71 लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे (दै. संध्या)**

विमानतळ पोलिसांनी मेफेड्रोन (एमडी) या अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या दोघांना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून एमडी, मोटार असा 26 लाख 71 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्रीतम प्रफुल्ल कुलकर्णी (वय 37, रा. साईनाथनगर, वडगाव शेरी), उबेर अन्सार खान (वय 27, रा. रेल्वे गेटजवळ, हडपसर) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. दोघांच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

- 3.59 ग्रॅम एमडी आणि दुचाकी जप्त
- मेफेड्रोन (एमडी) या अमली पदार्थाची तस्करी



पोलिस कर्मचारी हरी पुंडे आणि लालू कऱ्हे या दोघांना बातमी मिळाली होती की, जनक बाबा दर्गा चौकाजवळ खराडी बायपास चौकातून फॉरेस्ट पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावर एक व्यक्ती एमडी विक्रीसाठी येणार आहे. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक नितीन राठोड आणि त्यांच्या पथकाने प्रीतम याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून 3.59 ग्रॅम एमडी आणि दुचाकी जप्त करण्यात आली.

चौकशीत त्याने उबेर खान याचे नाव सांगितले. त्याला देखील पथकाने खुळेवाडी परिसरातून एमडी विक्रीसाठी आला असता पकडले. त्याच्या ताब्यातून चार ग्रॅम एमडी आणि चारचाकी मोटार जप्त करण्यात आली. ही कामगिरी पोलिस उपायुक्त सोमय मुंडे, पोलिस निरीक्षक गुन्हे शरद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

## केरोसीन वितरणासाठी नवे नियम; प्रत्येक कुटुंबाला 3 लिटर रॉकेल

### केरोसीन वितरणासाठी मार्गदर्शक सूचना केल्या जाहीर, अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांना प्राधान्य

**पुणे (दै. संध्या)**

केरोसीन (रॉकेल) वितरणाबाबत प्रशासनाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यानुसार प्रत्येक लाभार्थी कुटुंबास प्रतिशिधापत्रिका तीन लिटर केरोसीन देण्यात येणार आहे. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. उपलब्धतेनुसार श्वेतपत्रिकाधारक, शिधापत्रिका नसलेले कुटुंब (ग्रामपंचायत दाखल्यासह) तसेच स्थलांतरित मजूर यांनाही वितरण केले जाईल. केरोसीनचा संपूर्ण कोटा वाटप दिनांकापासून 45 दिवसांत उचलणे बंधनकारक असून, उर्वरित साठा पुढे नेण्यात येणार नाही. वितरण प्रक्रिया तेल कंपन्यांचे वितरक, किरकोळ परवानाधारक/ रास्तभाव दुकानदार, लाभार्थी अशा टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. प्रत्येक लाभार्थ्यास तीन लीटरप्रमाणे वाटप करणे आवश्यक असून, दर जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित केलेले राहतील.



तेल कंपन्यांनी पुरवठा नियमित ठेवावा, तसेच 85 टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. तालुकास्तरावर तहसीलदारांच्या देखरेखीखाली वितरण होणार असून, गैरवापर टाळण्यासाठी संयुक्त तपासणी पथक (तहसीलदार, पुरवठा अधिकारी, पोलिस) नियुक्त करण्यात येणार आहे. केरोसीनचा वापर फक्त घरगुती कारणासाठीच करता येणार असून, भेसळ किंवा अनधिकृत विक्री आढळल्यास जीवनावश्यक वस्तू अधिनियम, 1955 अंतर्गत कारवाई करण्यात येईल. संबंधितांनी या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## पुणे विद्यापीठ कारभार सुधारण्यासाठी 3 महिन्यांची मुदत

**पुणे (दै. संध्या)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना विद्यापीठाचा कारभार सुधारण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे. परंतु, गेल्या तीन वर्षांत झाले नाही ते तीन महिन्यांत कसे होणार? असा प्रश्न माजी अधिसभा सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांना विचारला असून, विद्यापीठाच्या कुलगुरूंना कार्यपद्धती बदलण्याचा सल्ला दिला आहे.

कुलकर्णी म्हणाले, की चंद्रकांत पाटील यांनी काही विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिसभा सदस्य यांची बैठक बोलावली. त्या बैठकीत विद्यापीठ कारभाराविषयी प्रत्यक्षदर्शींकडून माहिती घेतली. परिणामी, कारभार सुधारण्यासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना तीन महिन्यांची मुदत दिली. जर कारभारात योग्य सुधारणा झाल्या नाहीत, तर कडक कारवाई करण्याचे संकेत बैठकीतील चर्चेदरम्यान दिले.

परंतु तीन महिन्यांत नियमित कुलसचिव निवड प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे तीन महिन्यांत विद्यापीठास नियमित कुलसचिव मिळणार नाही. कॅग अहवालातील फक्त एकाच विभागाच्या आक्षेपावर अधिसभेत चर्चा झाली. परंतु 35 आक्षेप नोंदविलेले आहेत, त्याचे काय, फॉरेन्सिक ऑडिट तीन महिन्यांत होणार नाही.

## महापौर मंजुषा नागपुरे भीमगीतांच्या तालावर रंगल्या



**पुणे (दै. संध्या)**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) छत्रपती शिवाजीनगर मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने बोपोडी येथे भव्य जयंती महोत्सवाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या या सोहळ्यात आकर्षक विद्युत रोषणाई, दमदार स्पीकर शो आणि भीमगीतांनी परिसर भारावून गेला. या उत्साहपूर्ण वातावरणात पुण्याच्या प्रथम नागरिक महापौर मंजुषा नागपुरे यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भीमगीतांच्या तालावर ठेका धरला. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली आणि नागरिकांमध्ये आनंदाची लहर पसरली.

या वेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. विजय खरे, अविनाश कदम, कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक व उपमहापौर परशुराम वाडेकर तसेच माजी उपमहापौर सुनीता वाडेकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी क्रेनच्या सहाय्याने तब्बल ३० फूट उंचीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

## सावरकर मानहानी प्रकरणात सात्यकी सावरकरांचे महत्त्वाचे विधान

**पुणे (दै. संध्या)**

अंदमान कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबरोबर काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या 568 क्रांतिकारींनी हालअपेष्टा सहन केल्या. यामध्ये, काहींचा मृत्यू झाला. ते सर्व माझ्यासाठी समान असून, मला त्यांच्याविषयी आदर आहे, अशी माहिती स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात दिली. काळ्या पाण्याच्या शिक्षेदरम्यान काही क्रांतिकारकांचा अंदमानच्या कारागृहातच मृत्यू झाल्यामुळे त्यांना देखील स्वातंत्र्यवीर म्हणता येईल का? या बचाव पक्षाने विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

लंडन येथील अनिवासी भारतीयांसमोर राहुल गांधी यांनी केलेल्या भाषणात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी बदनामीकारक विधान केले होते. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी गांधी यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला आहे.

## घरगुती गॅस दिला व्यावसायिक वापरासाठी, दुकानदाराला अटक

### १०३ गॅस सिलिंडर जप्त; पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला

**पुणे (दै. संध्या)**

घरगुती गॅसचा अवैध पद्धतीने साठा करून काळाबाजार करणाऱ्या दुकानावर काळेपडळ पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत तब्बल १०३ गॅस सिलिंडर जप्त करून पोलिसांनी नितीन हनुमंत होळकर (वय ३८, रा. हांडेवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. होळकर याच्याकडे गॅस साठवणूक करण्याचा कोणताही परवाना नसताना त्याने या गॅस सिलिंडरच्या टाक्यांचा साठा केला होता.

काळेपडळ पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार महादेव शिंदे यांना हांडेवाडी परिसरात एक दुकानदार घरगुती गॅस सिलिंडरमधून




व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये गॅस ट्रान्स्फर करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. त्या वेळी घरगुती वापरासाठी असलेल्या गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापरासाठी तसेच काळाबाजारासाठी साठा करून ठेवण्यात समोर आले.

या वेळी पोलिसांनी तेथून १०३ गॅस सिलिंडर टाक्या, चारचाकी गाड्या आणि इतर साहित्य असा 10 लाख 9 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. चौकशीत आरोपीकडे गॅस साठवणुकीसाठी आवश्यक परवाना नसल्याचेही निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अत्यावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस उपायुक्त राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनात काळेपडळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील, सहायक निरीक्षक अमित शेटे, अंमलदार प्रवीण काळभोर, दाऊद सय्यद, प्रतीक लाहिगुडे, अमोल फडतरे, विशाल ठोंबरे, शाहीद शेख, लक्ष्मण काळे, अतुल पंधरकर यांच्यासह पथकाने केली.

# पुणेकरांसाठी खुशखबर! तिरुपतीसाठी नवीन फ्लाइट सुरु

## मे 2026 पासून Star Air ही सेवा आठवड्यातून 6 दिवस चालवणार

**पुणे (दै. संध्या)**

पुणेकरांसाठी आनंदाची बातमी आहे. पुणे विमानतळावरून आता तिरुपतीसाठी नवीन फ्लाइट सेवा सुरू होणार आहे. यामुळे प्रवाशांचा वेळ वाचणार असून प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. पुणे विमानतळावर भारतीय हवाई दलाकडून 15 अतिरिक्त फ्लाइट स्लॉट्स मंजूर करण्यात आले आहेत.

यामुळे विमानतळावरील एकूण स्लॉट्सची संख्या 220 वरून 235 झाली आहे. या निर्णयामुळे पुणे शहराची तिरुपती, मंगळुरू आणि बागडोगरा यांसारख्या शहरांशी कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.

- पुणे विमानतळावरून सोलापूरमार्गे तिरुपतीसाठी नवीन फ्लाइट सेवा सुरू होणार आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुणे ते तिरुपती हा प्रवास आता सोलापूरमार्गे होणार आहे. हा नवीन रूट असा असेल: पुणे – सोलापूर – तिरुपती. ही सेवा स्टार एअर (Star Air) कडून सुरू करण्यात येणार आहे. ही नवीन सेवा 1 मे 2026 पासून सुरू होणार आहे. ही फ्लाइट




आठवड्यातून 6 दिवस (शनिवार वगळता) उपलब्ध असेल. पुण्यात फ्लाइट दुपारी सुमारे 3:20 वाजता येईल आणि 4:00 वाजता पुढे जाईल.

**प्रवाशांना काय फायदा?**

सध्या पुणे ते तिरुपती जाण्यासाठी प्रवाशांना हैदराबाद किंवा बेंगळुरूमार्गे कनेक्टिंग फ्लाइट घ्यावी लागते. यासाठी 4 ते 6 तास लागू शकतात. पण नवीन रूटमुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन अंदाजे 1 तास 45 मिनिटांचा होईल (थेट सेवा उपलब्ध झाल्यास).

सध्या कनेक्टिंग फ्लाइट्सचे तिकीट 3,500 रुपये ते 7,500 रुपयांच्या दरम्यान आहे. ही फ्लाइट सेवा UDAN (उडान - उडे देश का आम नागरिक) योजनेअंतर्गत सुरू होत आहे. यामुळे छोट्या शहरांना मोठ्या शहरांशी जोडण्याचा उद्देश साध्य होणार आहे. थोडक्यात पुणेकरांसाठी तिरुपतीचा प्रवास आता अधिक सोपा, वेगवान आणि किफायतशीर होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सौर ऊर्जेतून कृषिपंपाना वीज देण्यात महावितरणची कामगिरी दिशादर्शक

मुंबई (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महावितरणची कामगिरी इतर राज्यांसाठी दिशादर्शक आहे. राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी सुरु असलेल्या या योजनांची माहिती घेतल्यानंतर मध्यप्रदेशच्या पथकाकडून हे गौरवोद्गार काढण्यात आले. मध्यप्रदेशच्या पथकाने अभ्यास दौऱ्यात बुधवारी (१५ एप्रिल) महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड येथे सौर ऊर्जेतून कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती घेतली. संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंते ज्ञानेश कुलकर्णी, पंकज तगलपल्लेवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी सादरीकरणाच्या माध्मातून योजनांची सविस्तर माहिती दिली. मध्यप्रदेशच्या पथकात मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक गुरुदीप सिंग कनुजा, सहाय्यक महाव्यवस्थापक धिरज कुमार मुनिया, अधीक्षक अभियंता चिंतामणी ठाकर, व्यवस्थापक शंकर नारायण अग्रवाल, विनोद राऊत यांचा समावेश होता. जगातील सर्वात मोठा १६ हजार मेगावॅट विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत ३ हजार १८७ कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १२ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा ४ हजार ७७९ मेगावॅट विजेचा पुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. याशिवाय मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनेसह विविध योजनांमधून राज्यात ९ लाख १७ हजार ५८७ कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. देशभरात बसवण्यात आलेल्या एकूण ऑफ ग्रीड सौर कृषिपंपांपैकी ६४ टक्के कृषिपंप एकट्या महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील ३२ लाख ७६ हजार म्हणजेच एकूण कृषिपंपांपैकी ७३ टक्के कृषिपंपांना सध्या दिवसा वीज पुरवठा सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### मंदिरांमधील 'पेड दर्शन' सुविधा बंद करा आणि देवस्थानांमध्ये राजकीय नियुक्त्या नकोत

त्र्यंबकेश्वर (दैनिक संध्या) : येथील ज्योतिर्लिंग मंदिर संस्थानमध्ये भाविकांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी शरद पवार गटाचे प्रदेश युवक कार्याध्यक्ष आणि मंदिर संस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांसह गोटीराम मनाजी पेहरे अन् अभिषेक कडलग यांना पोलिसांनी अटक केली आहे. येथे २०० रुपयाचा अधिकृत पास असतांना १० मिनिटांत दर्शनाचे आमीष दाखवून भाविकांकडून ३ ते १२ हजार रुपये मागितले जातात, असा प्रकार समोर आला आहे. हाच प्रकार तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात होत असून तेथे २०० रुपये 'पास' देऊन विशेष दर्शन दिले जाते. हाच 'पास' नवरात्र काळात ३०० रु, ५०० रुपये आणि १ हजार रुपये करण्यात येतो. येथेही अनेक वेळा अतिरिक्त शुल्क घेऊन दर्शनासाठी सोडल्याच्या भक्तांच्या तक्रारी आल्या आहेत. खरेतर 'सशुल्क दर्शनसेवा' हा प्रकारच चुकीचा असून यामुळे भाविकांमध्ये भेदभावाची भावना निर्माण होते. दूरवरून येणाऱ्या ज्या भक्तांकडे पैसे नाहीत त्यांनी काय करायचे? पैशांअभावी दर्शन नाकारले जाणे हा त्यांच्या श्रद्धेचा अपमान आहे आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत घटनात्मक धार्मिक अधिकारावर आणलेली गदा आहे. देवाच्या दृष्टीने गरीब-श्रीमंत सर्व समान असल्याने प्रत्येकासाठी दर्शनाची पद्धत सारखीच असणे अपेक्षित आहे. केवळ उत्पन्न वाढीचा विचार करण्यासाठी मंदिर हे एखादे व्यावसायिक आस्थापन वा दुकान आहे का? त्याचसमवेत अशा पासचा काळाबाजार करण्याची वृत्ती सर्वत्र फोफावत आहे. त्यामुळे नाशिक, तुळजापूरसह राज्यातील सर्वच सरकारीकरण झालेल्या मंदिरांमधील 'सशुल्क दर्शनसेवा'(पेड दर्शन) सुविधा बंद करावी, अशी मागणी मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी केली आहे. जेव्हा मंदिरे सरकार किंवा राजकीय नियुक्त्या असलेल्या समित्यांच्या कह्यात जातात, तेव्हा तिथे भक्तीऐवजी व्यापारी वृत्तीचा शिरकाव होतो. त्र्यंबकेश्‍वरमधील ही घटना म्हणजे मंदिर सरकारीकरणाचे दुष्परिणामच होय. 'अतिथी देवो भव ।' मानणाऱ्या भूमीत भाविकांना लुबाडण्यासाठी विश्‍वस्तांनीच यंत्रणा चालवावी, यासारखे दुसरे दुर्दैव नाही ! त्र्यंबकेश्‍वर देवस्थानातील विश्‍वस्त नियुक्तीत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप माजी विश्‍वस्तांनी केला आहे. त्यामुळे या 'पेड' दर्शनाची सखोल चौकशी करून यात आणखी कुणाचा सहभाग आहे, याचेही अन्वेषण व्हावे, अशी मागणी मंदिर महासंघाच्या वतीने करण्यात येत आहे. यापुढील काळात असे प्रकार टाळण्यासाठी देवस्थानांमध्ये विश्‍वस्त म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी यांची नियुक्ती करण्याऐवजी तिथे देवाचा भक्त-भाविक म्हणून नेमणूक होणे आवश्यक आहे आणि यापुढे तसा बदल देवस्थानच्या घटनेत करावा, अशी मागणी मंदिर महासंघाच्या वतीने करत आहोत.

### कॉग्निझंटकडून टेक्रोव्हर्स हॅकॅथॉन 2026ची घोषणा

बंगळुरू (दैनिक संध्या) : कॉग्निझंटने (नॅसडॅक: CTSH) कॉग्निझंट टेक्नोव्हर्स हॅकाथॉन 2026ची घोषणा केली आहे. तिसऱ्या पर्वात प्रवेश करत असलेली ही स्पर्धा प्रादेशिक उपक्रमातून देशव्यापी व्यासपीठात रूपांतरित झाली असून, देशभरातील 400हून अधिक महाविद्यालयांमधील 20,000 पेक्षा जास्त प्री-फायनल वर्षातील अभियांत्रिकी विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. या माध्यमातून विद्यार्थी एकत्र येऊन सहयोग, नवकल्पना आणि एआय-आधारित समस्यांवर उपाय शोधण्याची आपली क्षमता सादर करतील. कॉग्निझंटच्या ग्लोबल ऑपरेशन्सचे प्रेसिडेंट तसेच कॉग्निझंट इंडिया चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर राजेश वरियर म्हणाले, "उद्योगक्षेत्रासाठी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून एआयच्या माध्यमातून घडणाऱ्या बदलांना गती देणारी पुढील पिढी तयार करण्यासाठी कॉग्निझंट कटिबद्ध आहे. कॉग्निझंट टेक्नोव्हर्स हॅकॅथॉन 2026 हे असे व्यासपीठ आहे, जिथे देशातील गुणवान अभियांत्रिकी विद्यार्थी प्रत्यक्ष उद्योगातील समस्यांवर काम करतात, व्यापक दृष्टीकोनातून विचार करतात आणि भविष्यातील तंत्रज्ञान क्षेत्रातील नेतृत्वाकडे पहिले पाऊल टाकतात." या हॅकॅथॉनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान आणि प्रत्यक्ष कामातील उपयोग यांचा दुवा साधण्याची अनोखी संधी उपलब्ध होणार आहे. उद्योगाशी संबंधित समस्यांवर काम करण्याची, कॉग्निझंटमधील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची आणि कंपन्यांमध्ये नवकल्पना कशा घडतात, याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी या ठिकाणी मिळते. बँकिंग, इन्शुरन्स, हेल्थकेअर, लाईफ सायन्सेस, रिटेल, मॅन्युफॅक्चरिंग, कम्युनिकेशन्स, मीडिया अँड टेक्नॉलॉजी तसेच एनर्जी अँड युटिलिटीज या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उपाय सहभागी विद्यार्थी विकसित करणार आहेत. भारतामधील कामकाजात सर्वसमावेशकतेला दिलेल्या महत्त्वाच्या पार्श्वभूमीवर या हॅकॅथॉनमध्ये महिलांचा 50% सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे. प्रत्येक महाविद्यालयातून चार सदस्यांच्या एकापेक्षा अधिक टीम्स सहभागी होऊ शकतात, मात्र प्रत्येक टीममध्ये किमान दोन महिला सदस्य असणे आवश्यक आहे. ही हॅकॅथॉन मे महिन्यात होणार असून, पुण्यातील कॉग्निझंटच्या केंद्रात आयोजित समारंभात विजेत्या तीन टीम्सचा सत्कार करण्यात येणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान कौशल्यांसह, विशेषतः जनरेटिव्ह एआय क्षेत्रात व्यक्तींना सक्षम करण्याच्या व्यापक उद्दिष्टातून कॉग्निझंटने 2023मध्ये 'सिनॅप्स' हा कौशल्य विकास उपक्रम सुरू केला. या उपक्रमाच्या माध्यमातून 2026पर्यंत दहा लाख लोकांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे मूळ उद्दिष्ट आधीच गाठले आहे. या यशाच्या पुढील टप्प्यात कंपनीने 2030 अखेरपर्यंत एकूण दोन दशलक्ष लोकांना कौशल्यसंपन्न करण्याचे नवे लक्ष्य निश्चित केले आहे.

# हरियाणातील गवतपातळीवरील क्रीडेला नवे बळ

## आंतरराष्ट्रीय क्रीडा विकास व शांतता दिनाच्या पार्श्वभूमीवर हा सिग्निफाय खेळ ज्योती उपक्रम

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

सिग्नीफाय जागतिक स्तरावरील अग्रगण्य लाइटिंग कंपनी, भारतातील गवतपातळीवरील क्रीडा विकासासाठी आपल्या प्रमुख सीएसआर उपक्रम सिग्निफाय खेळ ज्योतीद्वारे सातत्याने योगदान देत आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा विकास व शांतता दिनाच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम क्रीडेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून अधोरेखित करतो. भारतामधील क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशाने कंपनीने हरियाण्यातील ग्रामीण भागातील चार कबड्डी आणि खो-खो केंद्रांमध्ये अत्याधुनिक, ऊर्जा-कार्यक्षम एलईडी स्पोर्ट्स लाइटिंग प्रणाली बसवली आहे. या उपक्रमामुळे स्थानिक क्रीडा परिसंस्थेला चालना मिळत असून खेळाडूंना सूर्यास्तानंतरही सुरक्षितपणे सराव व स्पर्धा करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

प्रकाशयुक्त क्रीडांगणांमुळे प्रशिक्षणाचा कालावधी वाढतो, दृश्यमानता सुधारते आणि सुरक्षितता वाढते. यामुळे युवक, महिला आणि स्थानिक समुदायांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. सुरक्षित आणि सर्वसमावेशक क्रीडा वातावरण निर्माण करून सिग्निफाय प्रवेशयोग्यता, प्रतिभा विकास आणि सामाजिक कल्याणाला चालना देत आहे.




या संदर्भात निखिल गुप्ता, हेड ऑफ स्ट्रॅटेजी अँड मार्केटिंग, सिग्निफाय, ग्रेटर इंडिया म्हणाले, "क्रीडा समुदायांना एकत्र आणते आणि तरुणांना संधी देते. सिग्निफाय खेळ ज्योतीद्वारे आम्ही गवतपातळीवरील सुविधा सुधारून दीर्घकालीन सामाजिक परिणाम घडवण्याचा प्रयत्न करत आहोत."

तसेच,जेएसडब्ल्यूचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिव्यांशु सिंह यांनी नमूद केले, "प्रकाशासारखा साधा हस्तक्षेप गवतपातळीवरील क्रीडेमध्ये मोठा बदल घडवू शकतो. हरियाण्यात प्रशिक्षणाचा कालावधी वाढल्याने खेळाडूंच्या कामगिरीवर सकारात्मक परिणाम होत आहे."

या उपक्रमामुळे विशेषतः मुलींच्या सहभागात वाढ झाली असून एकूण नोंदणीमध्येही लक्षणीय वाढ दिसून आली आहे. या केंद्रांनी यापूर्वीही राष्ट्रीय आणि व्यावसायिक स्तरावरील खेळाडू घडवले आहेत, ज्यामुळे अशा पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित होते. ही केंद्रे स्थानिक क्रीडा परिसंस्थेचा अभ्यास करून निवडण्यात आली असून प्रकल्पाची अंमलबजावणी प्रो स्पोर्ट डेव्हलपमेंटच्या सहकार्याने करण्यात आली. आजपर्यंत सिग्निफाय खेळ ज्योती उपक्रमांतर्गत देशभरातील २०० हून अधिक क्रीडा केंद्रांना प्रकाश देण्यात आला आहे, ज्यामुळे सर्वसमावेशक आणि शाश्वत क्रीडा विकासाला बळकटी मिळत आहे. सिग्निफाय खेळ ज्योती हरियाण्यातील गवताच्या पातळीवरील क्रीडेला उजाळा देत, पुढच्या पिढीतील खेळाडूंना सामर्थ्य देते

# एसटीचा तोटा कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश

## मोठ्या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले

**मुंबई (दै. संध्या) :**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आर्थिक कामगिरीबाबत परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष मा. ना. श्री. प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट भूमिका मांडत तोटा कमी करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.



या आर्थिक वर्षात एसटीचे एकूण चालनीय उत्पन्न ११,४७५ कोटी रुपये इतके नोंदविण्यात आले, तर खर्च १२,०६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला तब्बल ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. दैनंदिन सरासरी उत्पन्न ३१ कोटी ४० लाख रुपये असताना, खर्च ३३ कोटी रुपये इतका झाला असून दररोज सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांचा तोटा होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

राज्यातील एकूण ३१ विभागांपैकी केवळ ८ विभाग नफ्यात असून, उर्वरित २३ विभाग तोट्यात आहेत.

मागील आर्थिक वर्षात जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात होते. मात्र उर्वरित २३ विभागापैकी नाशिक, कोल्हापूर, नागपूर, रत्नागिरी, सातारा आणि ठाणे या मोठ्या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

"येत्या आर्थिक वर्षात वाहतुकीचे सुयोग्य नियोजन करून उपलब्ध बसेस आणि मनुष्यबळाचा अधिकाधिक कार्यक्षम वापर करणे अत्यावश्यक आहे. उर्वरित दीड ते दोन कोटी रुपयांचा दैनंदिन तोटा भरून काढणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे," असे ते म्हणाले.

तोट्यातील विभागांची सखोल चौकशी करून त्यामागील कारणांची मिमांसा करावी व त्यावर ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच सातत्याने तोट्यात असलेल्या मोठ्या विभागांमध्ये सक्षम आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूरसारख्या मोठ्या विभागात गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने तोटा होत असून तेथे अकार्यकारी विभाग नियंत्रक नेमण्यात आल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. "ज्या अधिकाऱ्यांकडे आर्थिक आणि वैधानिक अधिकार नाहीत, ते प्रशासनावर प्रभावी नियंत्रण ठेवू शकत नाहीत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना पर्यायी पदस्थापना देऊन सक्षम नेतृत्व देणे आवश्यक आहे," असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रशासनिक शिस्त, संसाधनांचा प्रभावी वापर आणि जबाबदारी निश्चिती या तत्त्वांवर भर देत लवकरच व्यापक सुधारणा आराखडा राबविण्यात येणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# फोक्सवॅगन इंडियातर्फे नवीन फोक्सवॅगन टायगुनची घोषणा

**मुंबई (दै. संध्या) :**

फोक्सवॅगन इंडिया ने भारतीय बाजारात आपली नवी फोक्सवॅगन टायगुन गाडी सादर केली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत १०.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली आहे. या नव्या गाडीत सुमारे ४० बदल करण्यात आले असून ती ९ वेगवेगळ्या रंगांमध्ये उपलब्ध आहे. या गाडीत १.० लिटर क्षमतेचे पेट्रोल इंजिन आणि नवीन ८-गती स्वयंचलित गिअर व्यवस्था देण्यात आली आहे, ज्यामुळे गाडी चालवताना अधिक गुळगुळीत अनुभव मिळतो आणि इंधनाची बचतही होते.

या गाडीच्या सादरीकरणासोबतच कंपनीने ग्राहकांसाठी एक खास योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार, गाडी खरेदी केल्यानंतर ३ वर्षे किंवा ३०,००० किलोमीटरपर्यंत वापरल्यानंतर ग्राहकांना गाडीच्या मूळ किमतीपैकी ७५ टक्के रक्कम परत मिळण्याची हमी दिली जाणार आहे (नियम व अटी लागू). त्यामुळे ग्राहकांना गाडी खरेदी करताना अधिक विश्वास मिळणार असून पुढे नवीन गाडी घेणेही सोपे होणार आहे. ही योजना ३१ मे २०२६ पर्यंत बुकिंग करणाऱ्यांसाठी लागू असेल.

फोक्सवॅगन इंडियाचे अधिकारी श्री. नितीन कोहली म्हणाले की, "ही गाडी भारतातील त्यांच्या गाड्यांपैकी महत्त्वाची असून ग्राहकांना चांगला देखावा, सुरक्षितता, दमदार कामगिरी आणि आधुनिक सोयी यांचा एकत्रित अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या गाडीत मोठा पडदा, आवाजावर चालणारी सुविधा, उघडता येणारे छत, तसेच सुरक्षिततेसाठी सहा हवेच्या पिशव्या (एअरबॅग) देण्यात आल्या आहेत." या गाडीची किंमत वेगवेगळ्या प्रकारांनुसार सुमारे १०.९९ लाख रुपयांपासून ते १९.२९ लाख रुपयांपर्यंत जाते. एकूणच, नवीन सोयी, चांगली कामगिरी आणि ग्राहकांसाठी दिलासा देणारी योजना यामुळे फोक्सवॅगन भारतीय बाजारात आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

# "देऊळ बंद २" च्या पोस्टरने जिंकली प्रेक्षकांची मने

**मुंबई (दै. संध्या) :**

बहुप्रतिक्षित "देऊळ बंद 2" च्या प्रदर्शनाची २१ मे २०२६ ही तारीख गेल्या आठवड्यात जाहीर करण्यात आली व त्यामुळे स्वामीभक्त आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

आनंदाबरोबरच उत्सुकता वाढली असतानाच आज "देऊळ बंद 2" चे पहिले पोस्टर प्रदर्शित झाले आणि आनंदात अजूनच भर पडली. "देऊळ बंद" मध्ये ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांनी आपल्या सशक्त अभिनयाने आणि आवाजाने स्वामी समर्थ अक्षरशः प्रत्यक्षात आपल्या समोर उभे राहून आपल्याशी संवाद साधत आहेत असे प्रेक्षकांना वाटत होते. तेच सर्वांना "देऊळ बंद 2" मध्ये अनुभवायला मिळणार आहे, कारण या भागात सुद्धा मोहन जोशी हेच श्री स्वामी समर्थांच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहेत तर महत्त्वपूर्ण भूमिकेत अभिनेत्री स्नेहल तरडे त्यांच्या सोबत असणार आहेत.




वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित "देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची" च्या पहिल्या पोस्टरमध्ये प्रसन्न मुद्रेने हात उंचावत स्वामी दुचाकीवर मागे बसले असून अभिनेत्री स्नेहल तरडे ती दुचाकी चालवत आहेत. स्वामी जरी प्रसन्न मुद्रेत असले तरी स्नेहल यांच्या चेहऱ्यावर राग आहे आणि डोळ्यातून अश्रू ओघळत आहेत, आता हा राग कशासाठी आणि दुःख कशाचे?

यासाठी प्रेक्षकांना चित्रपटाची वाट पाहायला लागणार आहे. 'भक्त कितीही संकटात असला तरी स्वामी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात', हाच संदेश या पोस्टरमधून अधोरेखित होत आहे. पहिल्या भागात स्वामींनी परदेशातून आलेल्या शास्त्रज्ञाच्या आलिशान चारचाकीतून प्रवास केला होता तर "देऊळ बंद २" मध्ये स्वामी एका गरीब महिलेच्या सामान्य दुचाकीवरून प्रवास करताना दिसत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना या चित्रपटात स्वामीकृपेने एका सामान्य कुटुंबाची असामान्य गोष्ट पाहायला मिळणार असे दिसत आहे.

# कीर्तीच्या भूमिकेतील नाट्यमय बदल

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले' सध्या उत्कंठावर्धक वळणावर आली आहे. भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेत कीर्तीची भूमिका साकारणारी अभिनेत्री गौरी अगरवाल प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. कथानक जसजसे पुढे सरकत आहे, तसतसा कीर्तीचा सकारात्मक ते नकारात्मक असा प्रवास अधिक गडद होताना दिसत आहे. मालिकेत कीर्ती रीत आणि राघव यांना वेगळे करण्यासाठी कोणतीही मर्यादा ओलांडताना दिसते.

# बजाज पल्सर १८० परतली!

**पुणे (दै. संध्या) :**



बजाज ऑटो या जगातील सर्वात व्हॅल्यूएबल टू-व्हीलर आणि थ्री-व्हीलर कंपनीने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय आणि आयकॉनिक मोटरसायकल्सपैकी एक असलेल्या पल्सर 180 च्या पुनरागमनाची घोषणा केली आहे! नव्या ग्राफिक्स, एलईडी हेडलॅम्प, ब्लिंकर्स आणि ब्लूटूथ कनेक्टेड डिजिटल कन्सोलसह सुसज्ज असलेली ही मोटरसायकल, रायडर्सच्या दमदार मागणीमुळे पुन्हा सादर करण्यात आली आहे. पल्सर ब्रँडच्या दोन महत्त्वाच्या मॉडेल्सपैकी पल्सर 150 आणि पल्सर 180 यांच्या लाँचला 25 वर्षे पूर्ण होत असताना, ही मोटरसायकल अधिक शार्प आणि विकसित अवतारात परतली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, गाव मौजे शिंदेवाडी , ता. जुन्नर, जि. पुणे येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या ( इनाम वर्ग ६ ब) मिळकती या अनुक्रमे न. 1) शिवाजी गेनभाऊ बेलकर राह. शिंदेवाडी ता.जुन्नर जि. पुणे नं. 2अ)रंगनाथ सखाराम बेलकर, 2ब)विशाल रंगनाथ बेलकर 2क)सुमन रंगनाथ बेलकर सर्व रा. पेमदारा , ता. जुन्नर, जि. पुणे यांचे मालकीची असुन, सदर मिळकत ते श्री.आनंद शंकर लाटे राह. कासारसाई ता.मुळशी जि.पुणे यांना अनुक्रमे रक्कम रुपये 16,00,000/- (सोळा लाख मात्र ), व 7,90,000/- ( सात लाख नव्वद हजार मात्र ) यांस विक्री करणार असुन, त्याबाबत त्यांची बोलणी चालू आहे. त्यांनी सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरोसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तसेच सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षिस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी बांगडी, खरेदी, साठेखत करार मदार, कुळ वहिवाट, विसार पावती इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी आमचे अशिलांना भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत मा. जिल्हा अधिकारी कुळकायदा शाखा पुणे, तहसिलदार कार्यालय जुन्नर यांची मूळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील. व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घेण्यात घ्यावी. शासन परिपत्रक नं. डब्ल्यूटीएन २०१९/ सीआर/२२९/ एल-४ दि. १० मार्च २००२ मधील मुंबई गावची कनिष्ट वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सुचनेनुसार गावच्या १५ कि.मी. परीसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किमतीत खरेदी करणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरुपात १५ दिवसाचे आत तहसिलदार कार्यालय जुन्नर, मा. जिल्हा अधिकारी कुळ कायदा शाखा पुणे यांना कळवावे.

-: परिशिष्ट :-

मिळकतीचे वर्णन - मौजे शिंदेवाडी ता. जुन्नर, जि. पुणे येथील जमीन - खाते नंबर 2262 वरील जमीन ग.नं.288/3 क्षेत्र 04 हे.20 ( पो.ख. सह ) खाते नंबर 2263 वरील जमीन ग.नं.288/3 क्षेत्र 01 हे.97.08 ( पो.ख. सह) येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत. कळावे.

अँड. रोहिणी एल. गाडेकर
दि. 13/04/2026 नोटरी भारत
सरकार ओतुर ता. जुन्नर, जि. पुणे
मोबा. ९८६०४८३०३१



**जेजुरी नगरपरिषद, जेजुरी**

जेजुरी नगरपरिषद सभागृहास "स्वर्गीय अजितदादा पवार सभागृह" असा ॲक्रेलिक मध्ये बोर्ड तयार करून बसविणेकामी दि. १७/०४/२०२६ ते २४/०४/२०२६ सायं. ४.३० पर्यंत जाहिर दरपत्रक मागविणेत येत आहे. व त्याचा सविस्तर तपशिल बांधकाम विभागाकडे उपलब्ध आहे.

सही/-
(चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरीनगरपरिषद, जेजुरी

जा.क्र./जेनपा/कावि/७९४/२०२६
दिनांक: १६/०४/२०२६



**पुणे महानगरपालिका, सांस्कृतिक केंद्रे विभाग**

**निविदा जाहिरात - शुद्धीपत्रक**

सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील नाट्यगृहाकरीता द्वारपाल (डोअर किपर) विषयक कामे करणे यांची निविदा जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तथापि या जाहिरातीमध्ये खालीलप्रमाणे बदल आहे.

| अ. क्र. | प्रसिद्ध केलेले | ऐवजी असे वाचावे |
| --- | --- | --- |
| १. | EMD रक्कम रुपये | EMD रक्कम रुपये |
| | ४ महिने | ५९,१०२/- |

वरीलप्रमाणे नमूद सुधारीत शुद्धपत्रक वाचण्यात यावे व बाकी जाहिरातीच्या मजकुरात कोणताही बदल नाही.

सही/-
(राजेश कामठे)
प्रशासन अधिकारी सांस्कृतिक केंद्रे
पुणे महानगरपालिका

जा. क्र. ८८
दि. १६/०४/२०२६



**पुणे महानगरपालिका, पुणे**

निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. १७/०४/२०२६ ते दि. २७/०४/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. १७/०४/२०२६ ते दि. २७/०४/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २८/०४/२०२६ १५.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| PMC/ELECTRICAL/ 2026/02 | विद्युत | पुणे मनपाच्या परिमंडळ क्रमांक ३ अंतर्गत येणाऱ्या स्मशानभूमीची ऑपरेटींगची कामे करणे. | रू. १३५९/- | रू. २३७७०२२/- | रू. २३७७०/- | १२ | Rajat Bobade ८७८८३११९१७ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Aarti Nathi
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्र. १/४० दि. १६/०४/२०२६*

## थोडक्यात पण महत्वाचे...




### गॅस बुकिंगच्या नावाखाली सायबर फसवणूक; पिंपरीत नागरिकांना इशारा

पिंपरी (दैनिक संध्या) : अमेरिका- इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस व डिझेलच्या संभाव्य टंचाईची चर्चा सुरू असताना, याच परिस्थितीचा गैरफायदा घेत सायबर चोरट्यांनी नागरिकांना गंडा घालण्याचा नवा डाव आखला आहे. गॅस बुकिंग केल्यानंतर ग्राहकांच्या मोबाईलवर कन्फर्मेशनच्या नावाखाली संशयास्पद लिंक किंवा फाईल पाठवली जात आहे. या लिंकवर क्लिक करताच मोबाईलमध्ये घातक सॉफ्टवेअर सक्रिय होऊन बँक खात्यांमधील रक्कम काही मिनिटांत गायब होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. पिंपरी-चिंचवड सायबर पोलिस ठाण्याकडे मागील काही दिवसांत अशा प्रकारच्या 5 ते 6 तक्रारी नोंद झाल्या असून, पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. या सायबर फसवणुकीतील महत्वाचा मुद्दा म्हणजे नागरिकांची घाई आणि भीती. गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण होणार असल्याची अफवा पसरवून तुमचे बुकिंग तात्काळ कन्फर्म करा, सब्सिडी अपडेट करा, डिलिव्हरी व्हेरिफाय करा, अशा आशयाचे संदेश पाठवले जातात. या संदेशांमध्ये दिलेली अझघ फाईल मोबाईलमध्ये इन्स्टॉल होताच ती मालवेअरप्रमाणे कार्य करते. परिणामी मोबाईलमधील जढझ, पासवर्ड, बँकिंग ॲप्समधील माहिती आणि वैयक्तिक डेटा थेट सायबर गुन्हेगारांच्या हाती लागतो. त्यानंतर काही मिनिटांतच संबंधित खात्यातील रक्कम वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे काढली जाते. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी बनावट वेबसाईट किंवा ॲप तयार करताना अधिकृत गॅस कंपन्यांचे लोगो, रंगसंगती आणि इंटरफेस हुबेहूब वापरतात. त्यामुळे ही सेवा अधिकृत असल्याचा भास निर्माण होतो. अनेक प्रकरणांमध्ये लिंक उघडताच मोबाईलवरील ॲप्स, कॉल आणि मेसेजेसवरही नियंत्रण मिळवले जाते. त्यामुळे वापरकर्त्याला काही काळ फसवणूक झाल्याची कल्पनाही येत नाही. या संपूर्ण प्रक्रियेत तांत्रिक कौशल्याचा वापर करून अत्यंत कमी वेळात आर्थिक नुकसान केले जात आहे.



### पिंपरीत माजी ट्रॅफिक वॉर्डन अटकेत; दुचाकी चोरीतून चेन स्नॅचिंग

पिंपरी (दैनिक संध्या) : वर्तणूक चांगली नसल्याच्या कारणावरून ट्रॅफिक वॉर्डन म्हणून काम करणाऱ्या एका तरुणाला कामावरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्याने वाहतूक पोलिसांनी जप्त केलेली दुचाकी चोरी केली आणि त्या चोरलेल्या दुचाकीवरून महिलांच्या गळ्यातील दागिने चोरले. याप्रकरणी वाकड पोलिसांनी आरोपी ट्राफिक वॉर्डनला अटक केली आहे. सचिन मानसिंग चव्हाण (27, रा. बोडकेवस्ती, माण) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, 8 एप्रिल रोजी सकाळी थेरगाव मधील गणेश मंदिर येथे सकाळी फिरण्यासाठी गेलेल्या एका महिलेचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या एका चोरट्याने चोरून नेले होते. याबाबत वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वाकड पोलिसांच्या पथकाने परिसरातील सुमारे 150 सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीचा येण्या-जाण्याचा मार्ग निश्चित केला आणि संशयित आरोपी सचिन चव्हाण याला माण येथून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने थेरगाव येथील चोरीसह आणखी एक चोरी केल्याची कबुली दिली. तसेच चतुःश्रृंगी येथे वाहन चोरीचा गुन्हाही त्याच्यावर दाखल आहे. पोलिसांनी सचिनकडून दोन दुचाकी, 23 ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण 4 लाख 75 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी सचिन चव्हाण हा यापूर्वी चतुःश्रृंगी वाहतूक विभागात ट्रॅफिक वॉर्डन म्हणून काम करत होता. त्याची वर्तणूक चांगली नसल्याने त्याला पाच महिन्यांपूर्वी कामावरून काढून टाकले होते. त्यानंतर आरोपीने मार्च 2026 दरम्यान वाहतूक विभागाजवळ डिटेन करून ठेवलेल्या दुचाकींमधील एक मोपेड चोरी केली आणि त्याच दुचाकीचा वापर करून चोरीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.



### क्रीडा शिक्षकांना निवडणूक व इतर प्रशासकीय कामातून मुक्त करा

पिंपरी (दैनिक संध्या) : औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला "क्रीडा नगरी" म्हणून नवी ओळख मिळावी, असे स्वप्न हजारो खेळाडू पाहत आहेत. मात्र, क्रीडा शिक्षकांना निवडणूक व इतर प्रशासकीय कामांमध्ये गुंतवले जात असल्याने खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. याबाबत भाजपा क्रीडा शहराध्यक्ष अरुण पाडुळे यांनी प्रशासनावर टीका करत क्रीडा शिक्षकांना तात्काळ निवडणूक व इतर गैर-क्रीडा कामकाजातून मुक्त करण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले की, "मैदानावर खेळाडू घडवणारे शिक्षक आज कागदोपत्री कामांमध्ये अडकले आहेत. यामुळे अनेक होतकरू खेळाडूंच्या स्वप्नांवर पाणी फिरण्याची शक्यता आहे." शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, महानगरपालिका शाळांमध्ये नवीन क्रीडा शिक्षकांची भरती तातडीने करावी, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली. "आज निर्णय घेतला नाही, तर उद्याचे अनेक राष्ट्रीय खेळाडू घडण्याआधीच थांबतील," असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी नगरसेवक कुंदन गायकवाड, नगरसेविका योगिता नागरगोजे आणि सचिन सानप उपस्थित होते.

# तळेगावात एकाच दिवशी चार ठिकाणी आगीचा थरार

## अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली; सीसीटीव्हीद्वारे तपास करण्याची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**

तळेगाव दाभाडे : तळेगाव दाभाडे स्टेशन परिसरात बुधवारी (दि. १५) दुपारी आगीच्या तीन वेगवेगळ्या घटना घडल्या. मात्र, नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठी दुर्घटना थोडक्यात टळली.

**बंद घरात फ्रीजचा भडका**

बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास राजगुरव कॉलनी येथील अशोक चव्हाण यांच्या बंद घराला अचानक आग लागली. घटनेच्या वेळी चव्हाण कुटुंब घराबाहेर असल्याने घराला कुलूप होते. खिडकीतून धूर येत असल्याचे पाहताच शेजाऱ्यांनी अग्निशमन दलाला पाचारण केले. जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत घराचे कुलूप तोडले आणि आत प्रवेश केला. घरातील फ्रीजने पेट घेतला असल्याचे लक्षात येताच जवानांनी सर्वप्रथम विद्युत पुरवठा खंडित केला आणि गॅस सिलिंडर सुरक्षितरीत्या बाहेर काढला. यामुळे घराचा मोठा स्फोट टळला.

**दुपारी पुन्हा दोन ठिकाणी आग**

घरातील आगीची घटना ताजी असतानाच, दुपारी १ वाजण्याच्या सुमारास 'स्वप्न नगरी' परिसरातील वाळलेल्या गवताने पेट घेतला. त्यानंतर तासाभरातच म्हणजेच दुपारी २ च्या सुमारास '२४ कॅरेट (रुबी) सोसायटी' जवळील कोरड्या गवताला भीषण आग लागली. सलग लागलेल्या या आगींमुळे परिसरात धुराचे लोट पसरले होते.

**अग्निशमन दलाची धाव**

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे अग्निशमन अधिकारी संतोष तेलगे यांच्या नेतृत्वाखाली निरंजन भेगडे, अनुपम सिंग, शुभम काळोखे, अक्षय घोडेकर, ओम भेगडे, आकाश ओव्हाळ आणि शेखर खोमणे या जवानांनी तिन्ही ठिकाणी शर्थीचे प्रयत्न करून आग विझवली.



**वाळलेली झुडपे ठरतायत 'डेन्जर झोन'**

तळेगावमधील डीपी रोड, स्वप्न नगरी यांसारख्या अनेक भागांत वाळलेल्या झुडपांचे साम्राज्य पसरले आहे. काही बेजबाबदार नागरिक जळती विडी किंवा सिगारेट या झुडपांमध्ये टाकतात, ज्यामुळे आगीच्या घटना वारंवार घडत आहेत. प्रशासनाने तातडीने ही वाळलेली झुडपे काढून टाकावीत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते लहू ढेरेंगे यांनी केली आहे.

**सीसीटीव्हीद्वारे तपास करण्याची मागणी**

"वाळलेल्या झुडपांना आग लागल्यानंतर प्रशासनाने परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासावेत. यामुळे आग नैसर्गिक रित्या लागली की कोणाच्या बेजबाबदारपणामुळे लागली, हे स्पष्ट होईल. दोषींवर कारवाई केल्यास भविष्यात अशा घटनांना आळा बसेल," असे मत माजी नगरसेवक सचिन टकले यांनी व्यक्त केले.

**तळेगावात डिझेल वाहनास भिषण आग**

तळेगाव दाभाडे स्टेशन भागात म्हाळसकर वाडी येथील महालक्ष्मी पेट्रोल पंप येथे एमएच 14 के ए 3799 या इंधक वाहतूक करणाऱ्या वाहनास बुधवारी सायंकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग स्पार्किंगमुळे लागल्याचे प्रथम दर्शनी समजते. वाहनात डिझेल होते.

गाडीचा ड्रायव्हर गोरख शिंदे किरकोळ जखामी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या अग्नीशमन दलास नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील यांच्याकडून माहीती मिळाली असता अग्नीशमन अधिकारी संतोष तेलगेसह कर्मचारी धीरज शिंदे, रियाझ मुलाणी, अनुपम सिंग, शेखर खोमणे, निरंजन भेगाडे, भास्कर माळी, बाळू ठाकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करुन सुमारे पाऊण तासात आग विझवली. अग्नीशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाल्यामुळे अनर्थ टळला.

## पीएमआरडीएचा विक्रम; 95 दिवसांत 14 मजली इमारत पूर्ण

**पिंपरी (दै. संध्या)**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) गृहनिर्माण आणि अभियांत्रिकी क्षेत्रात जागतिक स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा नवा झेंडा फडकावला आहे. चिखली येथील सेक्टर 12 गृहनिर्माण प्रकल्पात अवघ्या 95 दिवसांत 14 मजली इमारत उभी करण्याचा पराक्रम केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेत आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये या विक्रमाची सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यात आली आहे. यापूर्वीचा आपला 100 दिवसांचा जुना विक्रम मोडीत काढत बांधकामाचा नवा मापदंड प्रस्थापित केला.

चिखली येथील प्रकल्पस्थळी आयोजित सोहळ्यात आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे परीक्षक अशोक अदाक यांनी अधिकृत प्रमाणपत्र व पदक देऊन पीएमआरडीएचा गौरव केला.

प्राधिकरणाच्या वतीने मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी हा बहुमान स्वीकारला. पीएमआरडीएचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली हा यशस्वी प्रकल्प राबविण्यात आला.

## पिंपरीत बीआरटी मार्गिकेत खासगी वाहनांची घुसखोरी

### पीएमपी बसचा वेग घटला; प्रवाशांचा प्रवास धोकादायक, कठोर कारवाईची नागरिकांची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील बीआरटी मार्गिकांत खासगी वाहनांची घुसखोरी होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे सार्वजनिक वाहतुकीच्या सुरक्षेवर गंभीर परिणाम होत आहे. पीएमपीच्या बसगाड्यांसाठी राखीव असणाऱ्या मार्गिकेतून खासगी वाहने नेली जातात. त्यामुळे बीआरटी बस गाड्यांचा वेग कमी झाला असून प्रवाशांचा प्रवास धोकादायक बनला आहे.

पिंपरी-चिंचवडमधील पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांसाठी संयुक्त बीआरटी मार्गिका उभारण्यात आली आहे.




मात्र शहारातील आंळदी, वाकड, भोसरी, निगडी तसेच काही परिसरातील बीआरटी मार्गातून चारचारी आणि दुचाकी वाहने सर्रासपणे नेली जातात. त्यामुळे बस चालवताना चालकांला तारेवरची कसरत करावी लागत आहे. कारण अनेक व्यापारी किंवा वाहन चालक आपल्या सोयीसाठी मार्गिकेत वाहने उभी करत आहेत. त्यामुळे अपघात देखील होऊ शकतो.

बीआरटी मार्गात घुसखोरी केल्यानतंर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने वाहन परवाना रद्द, तसेच सीसीटीव्ही कॅमेरी बसविण्याचे विविध प्रयोग करण्यात आले होते; मात्र वाढलेली घुसखोरी लक्षात घेता, हा प्रयोग फसल्याचे वाढत्या घुसखोरी वरुन निर्देशनास येत आहे. त्यामुळे पीएमपी प्रवाशांना वेळत नोकरी व कामाच्या ठिकाणी नियोजीत ठिकाणी जाता येत नसल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. बीआरटी मार्गिकांवरील अनधिकृत वाहनांवर टोइंग कारवाई, दंडासह कठोर शिक्षा, नियमित पोलिस गस्त, आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## एमआयडीसीतील नाल्यांवरील अतिक्रमण हटवण्याचे आदेश

### नैसर्गिक जलप्रवाह बाधित; पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर उपाययोजना करण्याचे आयुक्तांचे निर्देश

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील तसेस, एमआयडीसी परिसरातील नैसर्गिक नाल्यांवर झालेले अतिक्रमण तसेच, बुजविण्याच्या प्रकारांमुळे नैसर्गिक जलप्रवाह बाधित होत आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचते. अधिकारी आणि संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून अतिक्रमण तात्काळ हटवून, नाले उघडे करावे, असे आदेश महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी शहरातील तसेच, एमआयडीसी परिसरातील नाल्यांची सद्यस्थिती, त्यावरील अतिक्रमणे तसेच, पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस एमआयडीसीच्या विभागीय अधिकारी अर्चना पठारे, उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता संजय कोतावाड, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अतुल पाटील, पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान एमआयडीसी परिसरातील ड्रेनेजलाईन व्यवस्थेचे सध्याचे स्वरूप, अडथळे व त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली. आयुक्त म्हणाले की, शहरातील एमआयडीसी परिसरात जुन्या नकाशांमध्ये दर्शविलेले अनेक नाले कंपन्यांकडून बुजविण्यात आले आहेत.

## नवी सांगवीत रोहित्राला आग

**पिंपळे गुरव (दै. संध्या)**

नवी सांगवी परिसरातील कृष्णा चौक ते एम. एस. काटे चौक रस्त्यावरील खाऊ गल्ली, ज्ञानेश पार्क येथे मंगळवारी (ता. १४) रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास महावितरणचे रोहित्र सुमारे दीड तास जळत राहिले. त्याच्या आगीची झळ नजीकच्या तीन अनधिकृत दुकानांनाही बसली.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहित्राने अचानक पेट घेतला. या दुर्घटनेची माहिती मिळताच रहाटणी येथील अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पाण्याच्या सहाय्याने आग शमविली. तसेच एक गॅस सिलिंडर सुरक्षितपणे बाहेर काढला. दरम्यान, महावितरणच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी पोहोचून खबरदारीचा उपाय म्हणून विद्युत पुरवठा तातडीने खंडित केला. रोहित्राला आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# १४३ नाल्यांची सफाई सुरू; एप्रिलअखेर काम पूर्ण होणार

## पावसाळ्यात पूरस्थिती टाळण्यासाठी महापालिकेची तयारी; 50 टक्के काम पूर्ण, गुणवत्तेवर भर

**पिंपरी (दै. संध्या)**

गेल्या वर्षी पावसाळ्यात शहरातील अनेक भागात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. यंदा तशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व लहान-मोठे असे एकूण 143 नाले सफाईला सुरुवात करण्यात आली आहे. आत्तापर्यंत 50 टक्के काम झाले आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत सर्व नाले स्वच्छ करण्याचे आरोग्य विभागाचे नियोजन आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात 2 ते 11 मीटर रुंदीचे 100 किलो मीटर अंतराचे एकूण 145 नैसर्गिक नाले आहेत. हे नाले शहरातील पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांना जाऊन मिळतात. सर्वच नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लास्टिक, भंगार, टाकाऊ साहित्य तसेच, कचरा टाकला जातो. अनेक नागरिक घरगुती कचरा तसेच, निर्माल्य या नाल्यांमध्ये टाकतात.



या नाल्यात गाळ साचल्याने नाले अरुंद व उथळ होतात. परिणामी पावसाळ्यात पाणी वाहून नेण्याची त्यांची क्षमता कमी होते. पावसाळ्याचे पाणी वाहून न गेल्याने ते साचून परिसरातील घर, हाऊसिंग सोसायट्या व दुकानांमध्ये शिरते.

त्यामुळे नागरिकांची मोठी वित्तहानी होते.

गेल्या वर्षी पावसाळ्यात चिखली, रूपीनगर, पिंपळे गुरव, नवी सांगवी, सांगवी, पिंपरीतील भाटनगर, दापोडी, चिंचवड गावासह अनेक भागांत पुराचे पाणी शिरले होते. त्यामुळे शेकडो नागरिकांचे स्थलांतर करण्याची वेळ महापालिकेवर आली होती.

त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. पूरस्थिती निर्माण होऊन नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हरून आरोग्य विभागाकडून दरवर्षी सर्व नाले, पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या (स्ट्रॉम वॉटर लाइन), चेंबर्स आणि गटारे स्वच्छ करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात होते. मात्र, गतवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात पावसाला सुरुवात झाली होती. त्यामुळे उन्हाळ्यातच हे काम पूर्ण करणे गरजेचे झाले आहे. आरोग्य विभागासह स्थापत्य विभाग व क्षेत्रीय कार्यालयांकडून नालेसफाई कामास मार्च महिन्याच्या अखेरपासून सुरुवात करण्यात आली आहे. मनुष्यबळासह जेसीबी व इतर यांत्रिक साधने वापरून काम केले जात आहे. त्या कामाची माहिती गुगल स्प्रेडशिटमध्ये भरली जात आहे. आत्तापर्यंत 50 टक्के काम पूर्ण झाले आहे.

पावसाळ्यात पाणी साचणे, नाले तुंबणे किंवा पूरस्थिती निर्माण होणे टाळण्यासाठी महापालिकेच्या सर्व यंत्रणांनी अधिक सजग व सक्षम राहणे आवश्यक आहे. नालेसफाईची कामे केवळ पूर्ण करणे नव्हे, तर ती गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

नालेसफाईचे काम सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या पथकांकडून करण्यात येत आहे. जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनद्वारे साफसफाई केली जात आहे. अरुंद नाल्यात मशिन जात नाहीत, अशा नाल्यांमध्ये सुरक्षेची सर्व साधने वापरून मनुष्यबळाद्वारे सफाई करण्यात येत आहे.

नालेसफाईपूर्वीचे व नंतरचे छायाचित्रे घेतली जाणार आहेत. प्रत्येक आठवड्याला नालेसफाईचा आढावा घेण्यात येत आहे. हे काम एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, असे आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुपा पोलिसांचा रूट मार्च

काऱ्हाटी (दैनिक संध्या) : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सुपा पोलीस ठाण्यातर्फे मंगळवारी रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. या रूट मार्चमध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच होमगार्ड सहभागी झाले होते. सुपा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील सुपा व मोरगाव या ठिकाणी हा रूट मार्च काढण्यात आला. यामध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल व केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे अधिकारी व जवान, तसेच स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. सुपा पोलीस ठाणे - सुपा माळ आळी ग्रामपंचायत कार्यालय सराफ कट्टा - बाजार तळ - बस स्थानक असा मार्ग ठरविण्यात आला होता. तसेच मोरगाव येथे मोरगाव चौक सराफ कट्टा - मंदिर परिसर ग्रामपंचायत कार्यालय सिद्धार्थ नगर मोरगाव चौक असा मार्ग निश्चित करण्यात आला होता. हा रूट मार्च सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, वाघोले, मोहरकर तसेच पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी व जवान आणि होमगार्ड यांनीही सहभाग नोंदविला.



### शेतकरी न्यायासाठी युवक काँग्रेसचा सत्याग्रह

पुणे (दैनिक संध्या) : भारत-अमेरिका कराराविरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे करण्यात आलेल्या शेतकरी न्याय सत्याग्रहाला पुणे जिल्ह्यातील युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा निर्णय भारतीय शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला असून, तो तात्काळ मागे घेतला गेला नाही, तर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा काँग्रेस कार्यकर्त्यांनी दिला. या सत्याग्रहाला माजी आमदार रामहरी रुपनवर व पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष लहू निवंगूने यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, वीरधवल गाडे, विश्वजीत जाधव, पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पवार, पिंपरी-चिंचवड युवक काँग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले, सौरभ अमराळे, यशवंत मोहोळ, वैभव यादव, अशोक घोलप, सौरभ रुपनवर, वैभव बुरंगुले, संकेत गवारी, राहुल जाधव, संदिप सातकर आदी पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या आंदोलनाला शेतकरी, युवक व सर्वसामान्य नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असून, आगामी काळात हा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. उमेश पवार यांनी केंद्र सरकारच्या या तथाकथित किसान ट्रेड डीलवर तीव्र टीका केली. ते म्हणाले, "शेतकऱ्यांच्या न्यायासाठी काँग्रेसने नेहमीच पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकारने घेतलेली धोरणे शेतकऱ्यांसाठी मारक आहेत. कर्जमाफी होत नाही. शेतीमालाला एमएसपीनुसार भाव मिळत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्यामुळे पुणे ग्रामीण युवक काँग्रेसच्या माध्यमातून गावागावातून युवकांना एकत्र करून हा लढा अधिक बळकट करण्यात येईल. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील. 'शेतकरी वाचवा, युवक वाचवा, भारत वाचवा' हा नारा जनमानसात पोहोचवण्याची गरज आहे."

### चाकण पंचक्रोशीत विजेचा खेळखंडोबा, बत्ती गुल होत असल्याने नागरिक त्रस्त

चाकण (दैनिक संध्या) : महावितरण विभागाकडून कोणतीही पूर्वसूचना न देता भारनियमनाच्या नावाखाली वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. चाकण शहर व परिसरात विजेचा खेळखंडोबा सुरू असून, क्षणाक्षणाला बत्ती गुल होत असल्याने शेतकरी, महिला व विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. सर्वांनाच मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून या गंभीर परिस्थितीची दखल घेणे अपेक्षित आहे. सध्या चाकण भागातील वाडी - वस्तीवर सिंगल फेज वीजपुरवठा होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम झाला आहे. कुट्टी मशीन, स्ट्रीट लाईट, दुध काढण्याच्या मशीन, पिठाच्या गिरण्या तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाणारे विज पंप, यांसारखी अनेक उपकरणे पूर्णपणे बंद पडली आहेत. शेती व दुग्ध व्यवसायावर विपरीत परिणाम होत असून शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. भविष्यात जर असा कोणताही भारनियमनाचा निर्णय घ्यायचा असेल, तर तो शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन किंवा त्यांच्याशी सविस्तर चर्चा करूनच घ्यावा आणि त्यापूर्वी योग्य ती पूर्वकल्पना सर्वांना देण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक मंगेशभाऊ कांडगे यांनी केली आहे.



### मुत्यु दाखल्यांचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते वाटप

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : मृत्यु अथवा जन्म दाखला मिळविण्यासाठी यापूर्वी शासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते. मृत्यु दाखला मिळवताना तर नातेवाईकांची हेळसांड होत होती. मात्र आता खुद्द महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यामध्ये जातीने लक्ष घातले असून मुत्यु दाखला यापुढे तातडीने देण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत. त्यानुसार लोणी कंद येथील कार्यक्रमात त्यांचा शुभारंभ करण्यात आला. पंधरा दिवसांपूर्वी हवेली तालुक्यातील बकोरी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या स्व.कमल गोविंदराव वारघडे यांचा मुत्यु दाखला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते वारघडे मातेचे सुपुत्र माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांच्या कडे सुपूर्द करण्यात आला.

# 'पीएमआरडीए'ला पुणे जिल्ह्यातील १८७८ हेक्टर जमीन

## शासनाचा मोठा निर्णय! पायाभूत सुविधा व प्रकल्प उभारता येणार..



| तालुका | संख्याक्षेत्र जमीन |
|---|---|
| हवेली | २६ ३७२.७७ |
| मुळशी | १७ ९५.९१ |
| दौंड | ४ ८.४९ |
| शिरूर | २० १११.७ |
| पुरंदर | ७ २२१.७६ |
| भोर | १० २२.३० |
| खेड | ४५ ७१४.०६ |
| मावळ | ४५ ३३१.७७ |
| एकूण | १७४ १८७८.७६ |

**पुणे (दै. संध्या)**

शासनाच्या मालकीच्या असलेल्या पुणे जिल्ह्यातील एक हजार ८७८ हेक्टर म्हणजे चार हजार ६९५ एकर जमिनी पायाभूत सुविधा आणि प्रकल्पांसाठी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) विनामूल्य मिळणार आहे. या जमिनींचा वापर प्रकल्प उभारण्यासाठी अथवा त्या माध्यमातून प्रकल्पांसाठी आवश्यक तो निधी उभारण्यासाठी प्राधिकरणाला करता येणार आहे.

प्राधिकरणाच्या हद्दीत सुमारे आठशेहून अधिक गावे आहेत. या गावांचा विकास आराखडा तयार करण्याची जबाबदारी या प्राधिकरणावर आहे. मध्यंतरी प्राधिकरणाकडून या गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र, त्या आराखड्यावरून न्यायालयीन वाद झाल्यामुळे तो रद्द करण्याची नामुष्की प्राधिकरणावर आली. आता प्राधिकरणाकडून विकास आराखडा तयार करण्यापूर्वी स्ट्रक्चरल आराखडा (प्लॅन) तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. या आराखड्यामध्ये प्रामुख्याने रस्ते याचबरोबर पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी जागा राखीव ठेवण्यात येणार आहे.

हवेलीसह पुणे जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये राज्य शासनाच्या मालकीच्या अनेक जमिनी आहेत. या जमिनी तशाच पडून आहेत. त्या जमिनीची राखण करणे जिल्हा प्रशासनाला अवघड जाते. अशा काही जागांवर अतिक्रमणे झाली आहे तर काही जागांवर येत्या काळात अतिक्रमणे होण्याची दाट शक्यता आहे. हे अतिक्रमण हटविण्याची जिल्हा प्रशासनाकडे कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे अशा जमिनी पुण्यासह राज्यातील चारही प्राधिकरणांना पायाभूत सुविधा आणि प्रकल्पांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य शासनाने गेल्या वर्षी घेतला होता.

त्यानुसार पुणे जिल्ह्यातील आठ तालुक्यातील सुमारे १ हजार ८७८ हेक्टर शासनाच्या मालकीच्या सुमारे १७४ जागा प्राधिकरणाच्या ताब्यात देण्यात येणार आहेत. याबाबतची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाच्या स्तरावरून सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले,"शासनाच्या मालकीच्या जमिनी प्राधिकरणाच्या ताब्यात देण्याबाबतचे आदेश मागील वर्षी राज्य शासनाने दिले होते. त्यानुसार अशा जागांची यादी तयार करण्यात आली आहे. त्या जागा प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## मीनथडी जत्रेत 108 स्टॉलच्या माध्यमातून 25 लाखांची उलाढाल

### जत्रेमध्ये पुणे, सातारा, नाशिक नगर आणि संगमनेर यासारख्या विविध भागातून स्टॉलधारक

**नारायणगाव (दै. संध्या)**



गेल्या 17 वर्षांपासून इंद्रधनु ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या मीनथडी जत्रेला याही वर्षी नागरिकांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला असून या यात्रेतून 25 ते 30 लाख रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे. अशी माहिती इंद्रधनु ग्रुपच्या संस्थापिका राजश्री ताई बोरकर यांनी दिली. यावर्षी जत्रेमध्ये पुणे, सातारा, नाशिक नगर आणि संगमनेर यासारख्या विविध भागातून 108 स्टॉलधारकांनी विविध प्रकारच्या वस्तू,साड्या आणि खाद्यपदार्थांचे लावण्यात आले होते.

या जत्रेचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य नेहा पाटे,पंचायत समिती सदस्य सुषमा वाव्हळ आणि जुन्नर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष सुजाता काजळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष प्रांजल भुतडा, उपाध्यक्ष निवेदिता डावखर, सचिव शितल ठुसे तसेच मनीषा बोरा, सुरेखा वाजगे, पुष्पा जाधव, जुई बनकर, ज्योती गांधी, सुनीता बोरा, भारती खिंवसरा, प्रियांका बोरकर आणि निर्मला गायकवाड यांनी केले होते. प्रास्ताविक राजश्री बोरकर यांनी केले तर सूत्रसंचालन शितल ठुसे यांनी केले.

## चाकण औद्योगिक वसाहतीतून एकाचे खुनाच्या उद्देशाने अपहरण

**चाकण (दै. संध्या)**

येथील औद्योगिक वसाहतीतील वासुली ता. खेड ,जि. पुणे येथील अमेझॉन कंपनीच्या गेट समोरून ऋषिकेश उर्फ दादया दिलीप कल्हाटकर रा. कोरेगाव बुद्रुक ता. खेड ,जि. पुणे या तरुणाचे सागर जावळे , ओमकार कोरडे , कुणाल चव्हाण यांनी त्यांच्या साथीदारासह थार तसेच आय टेन कार अशा दोन गाड्यांमध्ये येऊन जबरदस्तीने ऋषिकेश कल्हाटकर याला गाडीमध्ये बसवून त्याचे अपहरण केले. त्यानंतर पोलिसांनी सहा तासांमध्ये त्याची सुटका केली. अशी माहिती महाळुंगे उत्तर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,'आरोपींचा मित्र शुभम काळे याचा खून ऋषिकेश दिलीप कल्हाटकर याचा चुलत भाऊ संदीप कल्हाटकर व त्याच्या साथीदारांनी मिळून यापूर्वी केला होता .संदीप याच्या जामीनासाठी ऋषिकेश कल्हाटकर प्रयत्न करत असल्याने ऋषिकेश याच्यावर आरोपी चिडून होते. २०२४ मध्ये आरोपींनी ऋषिकेश वर पिस्तूल मधून पाच राऊंड फायर केले होते त्यातील तीन राउंड ऋषिकेश याची छाती व कमरेत लागून तो गंभीर जखमी झाला होता. त्या संदर्भात त्या आरोपी वर राजगुरुनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होता. त्या गुन्ह्यातून नाव वगळावे व गुन्हा मागे घ्यावा म्हणून ऋषिकेश याच्यावर आरोपी दबाव टाकत होते.

## नक्षलवादी 'हिडमा' गाण्यावर डान्स; दोन विद्यार्थ्यांवर गुन्हा

**पुणे (दै. संध्या)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात जहाल नक्षलवादी हिडमा मडावी याच्यावर आधारित गाण्यावर नृत्य सादर केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

किरण नारायण गोमासे (वय २२, मूळ रा. देचली, ता. अहेरी, जि. गडचिरोली, सध्या रा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह, विश्रांतवाडी) आणि श्रीनिवास हनुमंत कुमरी (वय २३, मूळ रा. झिंगाणूर, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली, सध्या रा. त्याच वस्तीगृहात) अशी आहेत. दोघेही बीबीएचे शिक्षण घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्रांतवाडी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात ११ एप्रिल रोजी आंबेडकर जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) संघटनेशी संबंधित आणि पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी (PLGA) चा बटालियन क्रमांक १ चा कमांडर असलेल्या हिडमा मडावी याच्यावर आधारित गाण्यावर नृत्य सादर करण्यात आले होते.

या प्रकारामुळे देशाच्या सार्वभौमत्व, एकात्मता आणि अखंडतेला बाधा पोहोचेल अशा प्रकारची दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी कारवाई केली आहे.

## 'एक गाव, एक मिरवणूक' काढत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**तळेगाव दाभाडे (दै. संध्या)**

तळेगाव दाभाडे येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक महोत्सव समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 'एक गाव, एक मिरवणूक' काढीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ढोल ताशाचा निनाद, झान्ज पथक, आकर्षक विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतिषबाजी, मुलींचे लेझिम आणि तळेगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अशा वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट सांगणारी ही मिरवणूक रमाकांतनगर, गणपती चौक मार्गे खडक मोहल्ला, बाजारपेठ, मारुती मंदिर चौक, जिजामाता चौक या मार्गाने काढण्यात आली. मिरवणूक मार्गातील चौकाचौकात फटाक्यांची आतिषबाजी आणि जेसीबीच्या सहाय्याने फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट मांडणारी चित्रफीत, तसेच लाल दिव्याच्या गाडीचे स्वप्न तरुणांनी बाळगावे, हा उद्देश सांगणारा चित्ररथ सर्वांना आकर्षित करून गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ॲम्बेसिडर कार प्रतिकात्मक देखावा स्वरूपात मांडण्यात आली होती. गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आसनस्थ देखावा डोळ्याचे पारणे फेडणारा होता.

या मिरवणुकीची सुरुवात आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, भाजपा किसान मोर्चाचे प्रसदेशाध्यक्ष गणेश भेगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुरेश धोत्रे, उपगराध्यक्ष गणेश काकडे, नगरसेवक निखिल भगत यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करून करण्यात आली.

मिरवणुकीची सांगता जिजामाता चौकात झाली. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष संतोष दाभाडे होते. यावेळी माजी उपनगराध्यक्ष चंद्रभान खळदे,राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे पुणे जिल्हाध्यक्ष सुहास गरुड, मनोहर पगारे, बाबाराव अंभोरे, शशिकांत गरुड, धीरज आगळे, प्रतीक आगळे, योगेश गरुड, संदीप गरुड, सुशील गरुड, संजय गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, शरद गायकवाड, अनिकेत रनपिसे, सर्वपक्षीय नेते, विविध संघटनाचे प्रतिनिधी, कार्यकर्ते, आंबेडकरी विचारधारेचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगता समारंभात निशा खिलाडी या मुलीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर केलेले भाषण अंगावर शहारे आणणारे होते. तिने सांगितले, की नाकारलेल्या समाजाला नवीन दिशा देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ. बाबासाहेब म्हणजे ज्ञानसूर्य, क्रांतीसूर्य होय. त्यांनी वडिलांच्या संपत्तीत मुलीलाही वाटा देण्यासंदर्भात कायदा केला. सर्व घटकांचा विचार करून संविधान दिले. विशेषतः महिलांना संविधानाने खूप अधिकार दिले.

यावेळी बोलताना संतोष दाभाडे म्हणाले, की 'एक गाव, एक मिरवणूक' हा स्तुत्य पायंडा आहे. इथून पुढे सर्व मिरवणूक, उत्सव तळेगावकर एकत्र येऊन साजरी करतील. हा गावाचा उत्सव झालेला आहे. पारंपरिक पद्धतीने मिरवणूक संपन्न झाली, हे विशेष आहे. जयंती कशी साजरी झाली पाहिजे, याचा यातून बोध घेतला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अख्ख्या जगाला जगायचं कसं याची शिकवण दिली आहे. नगरपरिषदेतही आम्ही त्यांच्या विचारानुसार काम करतो. इथून पुढेही त्यांच्या विचारावर काम करीत राहणार आहे.

# लाईट आहे तर पाणी नाही, पाणी आहे तर लाईट नाही

## लोणी काळभोर येथील समस्या कधी दुर होणार

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

लोणी काळभोर गावात लाईट आहे तर पाणी नाही, पाणी आहे तर लाईट नाही अशी सध्याची परिस्थिती असुन नागरिकांच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी ग्रामपंचायत व विद्युत मंडळ कमी पडत असल्याचे दिसून येत आहे.

तीन दिवसापूर्वी महात्मा फुले नगर येथील ट्रांसफार्मर (डीपी) जळाला तो दुरुस्ती करुन आणला व बसवला की पुन्हा जळाला मग महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जास्त क्षमतेवाला काल म्हणजे मंगळवारी बसवला. त्याच संध्याकाळी लोणी गावठाणात लाईटची केबल ब्लास्टझाली. आज दिवसभर फॉल्ट हुडकून रस्ता ब्रेकर ने फोडून केबल जॉईन केली आणि लाईट चालू केले असता ओव्हरलोड ट्रान्सफॉर्मर जळाला. सिमेंटच्या रस्त्याच्या खालुन केबल आणल्यामुळे लागोपाठ दोन वर्षे झाले केबल ब्लास्ट होत आहे.

मग सिमेंट रस्ता तयार करताना केबल बाजाराच्या कडेने का नेली नाही याचा विचार नागरिक करत आहे. महावितरणचे अधिकारी व कामगार ४० ते ४२ डिग्री मध्ये उन्हात उभे राहुन काम करत आहे. परंतु अधिकच्या लोड मुळे डीपी व केबलला प्रोब्लेम येत असुन ही केबल संपूर्ण पणे बाजाराच्या आतील बाजुकडुन टाकल्यास पुढील वर्षी केबल ब्लस्टची हॅट्रीक होणार नाही.



बत्ती गुल झाल्यामुळे लहान थोरांपर्यंत सगळ्यांची मोठी गैरसोय झाली आहे. डास तर जणु अंधाराचा फायदा आपल्याला मिळाल्यासारखे नागरिकांवर तुटून पडले आहेत.

त्यातच लोणी काळभोर गावातील पाणी पुरवठा पुर्णपणे विस्कळीत झाला असुन लागोपाठ दोन ते तीन वर्षे गाव दुष्काळाच्या छायेत आहे. पुण्यात व लोणीच्या परिसरातील गावात दररोज पाणी येते. परंतु नवीन मुठा कालवा वाहत असताना गावात तीव्र पाणी टंचाई आहे. कालवा उशाला आणि कोरड घशाला अशी अवस्थेतून लोणी काळभोर गावातील नागरिकांचा दिनक्रम चालू आहे. दोन दिवसातून एकदाच पाणीपुरवठा होत असुन पाणी सोडणाऱ्याच्या मर्जी प्रमाणे कारभार चालू आहे. कुठे एक तास तर कुठे अर्धा तासाच्या आसपास पाणी सोडले जात आहे. आणि गावात फेरफटका मारला असता दररोज हजारो लिटर पाणी अनेक गल्ली बोलात घरापुढे, दुकानापुढे मारले गेल्यामुळे हे ग्रामपंचायतीचे शुद्ध केलेले पाणी वाया जात आहे. याच्यावर कुणाचेही नियंत्रण नाही. कचऱ्याचा प्रश्न निर्माण झाला होता तो आता हळूहळू सुटत असल्याचे दिसून येत आहे परंतु नागरिकांच्या मुलभूत गरजा पाणी व लाईटची समस्या गेले दोन तीन वर्षांपासून काही सुटत नसल्याचे दिसुन येत आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे...




### मुंबईत अनोमली स्कॅन बंधनकारक होणार! जन्मजात विकृती रोखण्यासाठी महत्त्वाचा निर्णय

मुंबई (दैनिक संध्या) : बालमृत्यूंमध्ये जन्मजात विकृती हे प्रमुख कारण समोर आले आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेने हे मृत्यू रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. शहरातील सर्वच रुग्णालयांसह सोनोग्राफी केंद्रांवर अनोमली स्कॅन (सोनोग्राफी) बंधनकारक करण्यात येणार आहे. तसा ठराव तयार करण्यात आला असून तो लवकरच पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणार आहे. गर्भातील विकृतींचे वेळेवर निदान करून वैद्यकीय उपचार यामुळे शक्य होणार आहे. राज्य सरकारने सर्व गर्भवती महिलांनी गर्भधारणेच्या 18 ते 20 आठवड्यांच्या कालावधीत अनोमली स्कॅन (सोनोग्राफी) करणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खासगी रुग्णालये, प्रसूतीगृहे, सोनोग्राफी तज्ज्ञ आणि स्त्रीरोग तज्ञांना अनोमली स्कॅन बंधनकारक करण्याबरोबरच ही तपासणी नाममात्र शुल्कात उपलब्ध करून देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी या ठरावाद्वारे करण्यात आली आहे.



### राज्यात दहा महिन्यांत 176 महिलांचा लैंगिक छळ

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील महानगरांमधील महिला सुरक्षित असल्या, तरी कामाच्या ठिकाणी मात्र त्या असुरक्षित असल्याचे चित्र आहे. विविध आस्थापनांमध्ये 1 एप्रिल 2025 ते फेब्रुवारी 2026 या दहा महिन्यांच्या कालावधीत राज्यात 176 महिलांच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या तक्रारी राज्य महिला आयोगाकडे दाखल झाल्या आहेत. यामधील 128 तक्रारी निकाली निघाल्या असल्या, तरी अद्याप 28 तक्रारींवर कार्यवाही सुरू आहे. विशेष म्हणजे, राज्य महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या कार्यकाळात महिला लैंगिक छळाच्या 137 घटना घडल्या आहेत. दहा महिन्यांच्या कालावधीत कामाच्या ठिकाणी महिला छळाच्या 1 हजार 5 घटना घडल्या आहेत. यामध्ये 157 मागील तक्रारी असून, 848 नवीन घटना आहेत. यामधील 837 तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत, तर 168 प्रकरणे प्रलंबित असल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती पोलिस अधीक्षकांकडून तेथील आयटी क्षेत्रातील महिला कर्मचारी आणि नाशिक पोलिस आयुक्तांकडून तेथील लैंगिक शोषण प्रकरणाचा राज्य महिला आयोगाने अहवाल मागविला आहे. या अहवालाच्या आधारे या दोन्ही प्रकरणांतील तपासावर आयोग लक्ष देणार आहे. आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देण्यासाठी आयोगसुद्धा प्रयत्न करणार असल्याची माहिती, एका सदस्याने दिली. महिला अत्याचाराच्या आकडेवारीवरून आयोगाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अत्याचाराच्या 16 हजार 608 तक्रारींपैकी 14 हजार 831 तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. तर, 2 हजार 777 तक्रारींवर कार्यवाही सुरू आहे. चाकणकर यांच्या कार्यकाळात तक्रारींची संख्या झपाट्याने वाढल्याचे दिसून आले आहे.

### चक्क स्थायी समिती सभागृहातच चोरी

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या असलेल्या स्थायी समिती सभागृहात पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच पैशांची चोरी झाल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या नगरसेविका लक्ष्मी भाटिया यांनी आपल्या पर्समधून २० हजार रुपये चोरी गेल्याचा आरोप केला आहे. स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली होती. सभा संपल्यानंतर पार्श्वगायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली जात असताना, शिवसेना ठाकरे गटाच्या नगरसेविका समिती सदस्या लक्ष्मी भाटिया दाखल झाल्या. उशिराने सभागृहात झालेल्या भाटिया थोडावेळ सभागृहात बसल्यानंतर काही वेळात बैठक संपली. त्यामुळे सर्व सदस्य जेवण करण्यासाठी सभागृहाला लागून असलेल्या दालनात गेले. त्यांच्यासोबत भाटियाही आपली पर्स सभेच्या टेबलावर ठेऊन जेवणासाठी गेल्या. जेवण झाल्यानंतर त्या परत सभागृहात आल्या. यावेळी त्यांच्या पर्सची चैन उघडी असल्याचे दिसले. त्यामुळे त्यांनी पर्समधील वस्तूंची तपासणी केली असता, २० हजार रुपये नसल्याचे दिसून आले. आपले पैसे चोरीला गेल्याची तक्रार घेऊन भाटिया स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे गेल्या यावेळी शिंदे यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. शिंदे यांनी भाटिया यांचे म्हणणे ऐकून घेऊन, सचिव विभागाला चाकशीचे निर्देश दिले. दरम्यान आपले पैसे सभागृहात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी चोरल्याचा आरोप केला. या आरोपामुळे गेल्या कित्येक वर्षापासून स्थायी समितीचे कामकाज सांभाळणाऱ्या सचिव विभागातील कर्मचाऱ्यांना धक्का बसला आहे.

### बीकेसीत मोठी दुर्घटना टळली; मेट्रो बांधकामादरम्यान क्रेनचा अपघात

मुंबई (दैनिक संध्या) : बीकेसी येथे सुरू असलेल्या मेट्रो २ब मार्गिकेतील स्थानकाच्या बांधकामादरम्यान पूर्व निर्मित खांब (प्री-कास्ट बीम) उचलत असताना काही यांत्रिक बिघाडामुळे सुमारे ४०० टन वजनाची मोबाईल क्रेन एशियन हार्ट रुग्णालय जंक्शनजवळ कलंडल्याची घटना बुधवारी पहाटे ४.३०च्या सुमारास घडली; मात्र खांब पूर्णपणे न कोसळल्याने मोठी दुर्घटना टळली. दोन क्रेनच्या साहाय्याने प्रीकास्ट बीम (पूर्वनिर्मित काँक्रीट) मेट्रो स्थानकावर बसवण्याचे काम सुरू असताना, त्यापैकी एक क्रेन यांत्रिक बिघाडामुळे कलंडली. त्या प्रक्रियेदरम्यान बीम हा बसवण्याच्या स्थितीत असल्याने तोही एका बाजूला झुकला. कंत्राटदार जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड कंपनीच्या मार्फत मेट्रो मार्गिकेच्या रात्रीच्या कामादरम्यान ही घटना घडली. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा कोणालाही दुखापत झाली नाही. हा अवजड बीम कोसळला असता तर मात्र घटनास्थळी उपस्थित असलेल्यांना गंभीर दुखापत होऊ शकली असती. यामुळे मेट्रो कामांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त होत आहे. यापूर्वीही अनेकदा मेट्रो मार्गिकांच्या बांधकामांमध्ये दुर्घटना घडल्या आहेत. या घटनेनंतर कलंडलेली क्रेन तातडीने हटवून वाहतूक शक्य तितक्या लवकर सुरू करण्यासाठी एमएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. ही कलंडलेली क्रेन सुरक्षितपणे हटवण्यासाठी ६०० टन क्षमतेच्या क्रेनचा वापर करण्यात आला. घटनास्थळी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना आणि तपासणी करण्यात आली.

# गोदावरीसह उपनद्यांच्या स्वच्छतेचेही खासगीकरण


## नाशिक महानगरपालिका ८० कंत्राटी सफाई कर्मचारी नेमणार

**नाशिक (दै. संध्या)**

गोदावरी नदीसह शहरातील उपनद्यांच्या वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने स्वच्छता आणि देखभालीसाठी मोठा निर्णय घेतला आहे. गोदावरी तसेच वालदेवी, वाघाडी, कपिला आणि नंदिनी या उपनद्यांच्या काठावरील २०० फूट परिसराची साफसफाई, गाळ काढणे आणि नियमित देखभालीसाठी ८० कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यासंदर्भातील २.६५ कोटींचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

गोदावरी नदीला नाशिककरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. गोदावरी नदीकाठी दर १२ वर्षांनी भरणारा सिंहस्थ कुंभमेळा गोदावरीच्या महात्म्यात भर घालणारा आहे. मात्र, सध्या नदीकाठावर मोठ्या प्रमाणात कचरा, प्लास्टिक आणि गाळ साचल्यामुळे दुर्गंधी आणि अस्वच्छतेची समस्या वाढली आहे. याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावर होत असल्याने हा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने नदी आणि उपनद्यांची स्वच्छता राखण्याचे आदेश दिल्यानंतर महापालिकेने हा प्रस्ताव पुढे आणला आहे.

या योजनेंतर्गत २७३ दिवसांसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असून, महासभेची मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. नदी स्वच्छ ठेवणे, प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून गोदावरी व उपनद्यांच्या दोन्ही काठांवरील २०० फूट परिसराची नियमित साफसफाई, कचरा, प्लास्टिक आणि साचलेला गाळ काढणे, नदी परिसर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवणे तसेच काम पूर्ण झाल्यानंतर सातत्याने देखभाल करणे ही कामे केली जाणार आहेत.



| नदीनिहाय कर्मचारी नियुक्ती | |
|---|---|
| गोदावरी | ३५ |
| नंदिनी | २५ |
| वाघाडी | ०८ |
| वालदेवी | ०६ |
| कपिला | ०६ |
| इतर उपनद्या | २० |
| एकूण | ८० कर्मचारी |

### नगरसेवकांच्या भूमिकेकडे लक्ष

महापालिकेकडे आधीच सुमारे ८०० कंत्राटी सफाई कर्मचारी कार्यरत असून, नदी परिसरात नियमित स्वच्छता केली जाते. तसेच गोदावरी स्वच्छतेसाठी स्वतंत्र गोदावरी संवर्धन कक्षदेखील स्थापन करण्यात आला आहे. तरीही नव्याने ८० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव मांडण्यात आल्याने नगरसेवकांकडून या प्रस्तावाला मंजुरी मिळते का, याकडे लक्ष लागले आहे.

# कासारी मध्यम प्रकल्प: उन्हाच्या तडाख्याने पाणीसाठ्यात घट

## जलाशयात ४४.५४ टक्के साठा शिल्लक

**विशाळगड (दै. संध्या)**

शाहूवाडी आणि पन्हाळा तालुक्यातील ६१ गावांना सुजलाम सुफलाम करणाऱ्या कासारी मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे झपाट्याने खालावू लागला आहे. गेल्या वर्षी दमदार पाऊस होऊनही, यंदा कडाक्याच्या उन्हामुळे बाष्पीभवन आणि वाढत्या मागणीचा दुहेरी फटका धरणाला बसला आहे. सध्या धरणात केवळ ४४.५४ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, परिस्थिती चिंताजनक वळणावर पोहोचली आहे.

२.७७ टीएमसी साठवण क्षमता असलेल्या या धरणात सध्या १.२३ टीएमसी पाणी शिल्लक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा साठा ०.१७ टीएमसीने कमी आहे. बुधवारी (दि. १५) घेतलेल्या नोंदीनुसार, धरणाची पाणीपातळी ६१३ मीटरवर स्थिरावली आहे. गेल्या वर्षी याच दिवशी ही पातळी ६१४.४० मीटर इतकी होती. अवघ्या वर्षभरात झालेली ही घट भविष्यातील भीषण टंचाईचे संकेत देत आहे. मार्च महिन्यात जेमतेम निम्म्यावर असलेला हा साठा आता निम्म्यापेक्षाही खाली आला आहे. पारा वाढल्याने पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. ९ हजार ४५८ एकर सिंचन क्षेत्राला पाणीपुरवठा करताना पाण्याचा उपसा वाढला आहे. वाढत्या उन्हामुळे मानवी वस्त्यांमध्ये पाण्याची मागणी दुप्पट झाली आहे. पाटबंधारे विभागाने पाणी नियोजनाचा आराखडा तयार केला असला, तरी नागरिकांनी जबाबदारीने वागणे काळाची गरज आहे. "थेंब थेंब वाचवा" या उक्तीप्रमाणे पाण्याचा अपव्यय टाळून काटकसरीने वापर करावा, असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे. जर पावसाचे आगमन लांबले, तर परिस्थिती अधिक कठीण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



# वरठाण चौफुली येथे तब्बल बारा तास रास्ता रोको आंदोलन

**वरठाण (दै. संध्या)**

सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील चौफुलीवर लावण्यात आलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बॅनरची अज्ञात समाजकंटकाने विटंबना केली होती. ही घटना रविवार (दि.12) रात्री दहा वाजता समाजबांधवांच्या लक्षात आल्यावर समाजबांधव वरठाण चौफुलीवर जमा झाले. राज्य रस्ता क्र.24 वर तब्बल बारा तास रास्ता रोको आंदोलन करत या घटनेचा निषेध केला.

सदरील घटनेबाबत बनोटी चौकीत रीतसर तक्रार देण्यात आली. रात्रीच्या मुक्कामी असलेल्या बसेस पाचोरा सिल्लोड, चाळीसगाव सोयगाव,हनुमंतखेडा पाचोरा आदी बस व इतर खासगी वाहने जागेवरच थांबलेली होती या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सोमवारी (दि.13) सकाळी परिसरातील गावातील समाजबांधव मोठ्या संख्येने वरठाण चौफुलीवर जमा होत आरोपीचा शोध घेऊन तत्काळ अटक करण्याची मागणी करीत होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांनी कारवाईचे आश्वासन दिले.

या आश्वासनानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले. सकाळी दहा वाजता रस्ता सुरळीत करण्यात आला.या घटनेप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सोयगाव पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजानन आरेकर, जमादार संदीप सुसर, राजेंद्र बर्डे, नारायण खोडे आदी तपास करीत आहेत.

# खुलताबाद बाह्यमार्गावर दुचाकींची समोरासमोर धडक

**खुलताबाद (दै. संध्या)**

शहरातील बाह्यमार्गावरील न्यायालया समोर छत्रपती संभाजीनगर - वेरूळ महामार्गावर दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी तर दोघे किरकोळ जखमी झाल्याची घटना सोमवारी (दि.13) रात्री घडली. अजित अन्ना बनकर (20, रा. सुलिभंजन, ता. खुलताबाद) असे मृत तरुणाचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री दहा ते साडेदहाच्या सुमारास एक दुचाकी सुलिभंजन येथून खुलताबादच्या बाह्यमार्गाने वेरूळकडे जात होती, तर दुसरी दुचाकी वेरूळहून छत्रपती संभाजीनगरकडे येत होती. दरम्यान, दोन्ही चालकांना एकमेकांचा अंदाज न आल्याने समोरासमोर जोरदार धडक झाली.

या भीषण अपघातात अजित बनकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अप्पाराव घुसळे, शुभम घुसळे (रा. सुलिभंजन) तर खुलताबाद शहरातील सय्यद सावेज हे तिघे जखमी झाले. या तिघांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कल्याणकर आजींशी जोडले दहशतवाद्याचे संबंध

## हॅकर्सनी घातला 73.30 लाखांचा गंडा; एमएफसी पोलिसांकडून तपास सुरू

**डोंबिवली (दै. संध्या)**

पहलगाममध्ये ज्या दहशतवाद्याने हल्ला केला तो पाकिस्तानचा होता. त्या दहशतवाद्याकडे तुमचा मोबाईल क्रमांक आहे. त्या दहशतवाद्याने पैशांचे बेनामी व्यवहार केले आहेत. तुमचाही या सर्व प्रकरणात सहभाग असल्याचे आम्हाला कळाले आहे. तुमच्या बँक व्यवहारांची आम्हाला तपासणी करायची असल्याची ठापेबाजी करून पाच हॅकर्सनी मिळून कल्याणमध्ये राहणाऱ्या आजींकडून गेल्या पाच दिवसांच्या कालवधीत एकूण 73 लाख 30 हजार रूपये उकळल्याचे महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीतून उघडकीस आले आहे.




या प्रकरणी आजींनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. यातील तक्रारदार 82 वर्षीय आजी पश्चिमेकडील कल्याण-मुरबाड रोडला सिंडीकेट परिसरात असलेल्या एका गृहसंकुलात राहतात. आजींच्या बाबतीत फसवणुकीचा हा सारा प्रकार 6 ते 10 एप्रिल या कालावधीत घडला आहे. पोलिसांनी आजींच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गृहिणी असलेल्या आजी 6 एप्रिल रोजी घरी होत्या. त्यादिवशी स्वतःचे नाव विजय खन्ना असल्याचे सांगणाऱ्या इसमाने आजींशी मोबाईलद्वारे संपर्क साधला. त्यानंतर त्याच्या इतर चार साथीदारांनी देखिल संपर्क साधून तपास अधिकारी असल्याचे भासवून आजींना घाबरवून सोडले.

# 'कैसा हराया..' डायलॉगमुळे चर्चेत आलेल्या सहर शेख अडचणीत

## नगरसेवकपद जाणार?; बनावट जात प्रमाणपत्र वापरल्याचा आरोप; निवडणुकीदरम्यान शासकीय यंत्रणांची दिशाभूल

**ठाणे (दै. संध्या)**

ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत “कैसा हराया...” या डायलॉगमुळे राज्यभर चर्चेत आलेल्या AIMIMच्या नगरसेविका सहर शेख आता वादात सापडल्या आहेत. त्यांच्या नगरसेवकपदावरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सहर शेख यांनी निवडणूक लढवताना सादर केलेल्या जात प्रमाणपत्राबाबत गंभीर आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, हे प्रमाणपत्र बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळवण्यात आले असून संबंधित शासकीय यंत्रणांची दिशाभूल करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात सर्वात गंभीर बाब म्हणजे निवडणूक प्रक्रियेदरम्यान एक नव्हे, तर चार वेगवेगळ्या शासकीय यंत्रणांना चुकीची माहिती देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. जर हे आरोप सिद्ध झाले, तर त्याचा थेट परिणाम त्यांच्या निवडणुकीवर आणि पदावर होऊ शकतो.

या प्रकरणात सहर शेख यांचे वडील युनूस शेख यांच्यावरही आरोप आहेत. मूळचे उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील असलेल्या युनूस शेख यांनी महाराष्ट्रात स्थलांतर केल्यानंतर, नियमानुसार वेगळा नमुना लागू असतानाही दुसरा नमुना वापरून जात दाखला मिळवल्याचा आरोप आहे. याच दाखल्याच्या आधारे सहर शेख यांनी पुढे मुंबईतील जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रमाणपत्र घेतल्याचे सांगितले जात आहे.



या प्रकरणावर ठाणे तहसील कार्यालयात सुनावणीही झाली आहे. सुनावणीदरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, ठाण्याच्या रहिवासी असूनही मुंबईतून जात प्रमाणपत्र का घेतलं, यावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सहर शेख या AIMIM पक्षाच्या नगरसेविका असून त्यांनी 2026 मधील ठाणे महापालिका निवडणुकीत मुंब्रा प्रभाग क्रमांक 30 मधून विजय मिळवला होता. निवडणुकीदरम्यान त्यांनी आक्रमक प्रचार करत स्थानिक राजकारणात जोरदार एंट्री केली होती आणि त्यांच्या भाषणाच्या स्टाईलमुळे त्या चर्चेत आल्या होत्या.

सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू असून, आरोप सिद्ध झाले तर सहर शेख यांचे नगरसेवकपद धोक्यात येऊ शकते. राजकारणात आत्ताच एंट्री केलेल्या सहर शेख आता कायदेशीर अडचणीत सापडल्या आहेत. पुढील काही दिवसांत या प्रकरणात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बारामतीत वेश्या व्यवसायाचा भांडाफोड! लॉजवर पोलिसांचा छापा

बारामती (दैनिक संध्या) : बारामती -भिगवण रस्त्यावरील वंजारवाडीजवळील अमृता लॉज (सोमनाथ हॉटेल) येथे सुरू असलेल्या अवैध वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश झाला आहे. येथे बारामती तालुका पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकला. या वेळी दोन आरोपींना अटक केली, तर पाच महिलांची सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणात हॉटेलचालक अजित जयसीन शेट्टी (वय 38) व चाँद कलाम आलम (वय 20) यांना अटक केली आहे. लॉजवर पश्चिम बंगालमधील तीन, भिवंडी मुंबई येथील दोन अशा पाच महिला मिळून आल्या. त्यांची सुटका करत त्यांना सुधारगृहात ठेवण्यात आले. पहाटे तीनच्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, उपनिरीक्षक रामहरी भोसले यांच्या पथकाने बोगस ग्राहकांच्या मदतीने सापळा रचला. पंचांना सोबत घेऊन नियोजनपूर्वक अमृता लॉजवर धाड टाकली. लॉजमधील विविध खोल्यांची तपासणी केली असता महिला व ग्राहक एकत्र आढळून आले. चौकशीत संबंधित आरोपी हे बाहेरून महिलांना आणून त्यांना ग्राहकांना पुरवत असल्याचे उघड झाले. ग्राहकांकडून पैशांची वसुली करून त्यातून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेत असल्याचेही समोर आले. दोघा आरोपींनी संगनमत करून महिलांना पैशांचे आमिष दाखवत देहव्यवसाय चालविल्याचे निष्पन्न झाले आहे. कारवाईत पोलिसांनी बोगस ग्राहकाला दिलेल्या नोटांसह रोख रक्कम, मोबाईल फोन, निरोधची पाकिटे तसेच ग्राहकांची नोंद असलेले रजिस्टर असा सुमारे 17 हजार 800 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलिस उपनिरीक्षक रामहरी भोसले, अंमलदार संतोष कांबळे, केदारनाथ बिडवे, नितीन ढवाण, राजू बन्ने, नीलेश वाकळे, विठ्ठल तरंगे, स्मिता गायकवाड यांच्या पथकाने केली.




### 40 अंशांचा कहर! पाणीसाठे आटले, बाजारपेठा ओस

पुणे (दैनिक संध्या) : एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच पुणे जिल्ह्याला उन्हाच्या तीव झळा बसू लागल्या आहेत. जिल्ह्याचा तापमानाचा पारा 40 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिकांच्या जीवाची लाही-लाही होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे केवळ जनजीवनच नाही, तर जलसाठे, शेती आणि व्यापारावर देखील याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. उन्हाच्या वाढत्या तीवतेमुळे धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. पुणे जिल्ह्याची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरण साखळीत सध्या पाणीसाठा वेगाने कमी होत आहे. यासह जिल्ह्यातील महत्त्वाची धरणे जसे की भाटघर, नीरा देवघर, गुंजवणी आणि चासकमान येथील पाणी पातळीतही कमालीची घट झाली आहे. अनेक धरणांनी तळ गाठायला सुरुवात केल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उन्हाचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील शेतीला बसला आहे. कडक उन्हामुळे पिकांना पाणी देण्याच्या वेळेत बदल करावा लागत आहे. विहिरींच्या पाणीपातळीत घट झाल्याने फळबागा विशेषतः डाळिंब, द्राक्षे आणि केळीच्या बागा वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी ओढाताण होत आहे. उन्हाच्या तीवतेमुळे पिकांची पाने करपत असून, उत्पादनात घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. दुपारच्या सुमारास रस्ते ओस पडत असून, बाजारपेठांमधील वर्दळ पूर्णपणे थांबली आहे. उन्हामुळे नागरिक घराबाहेर पडणे टाळत असल्याने कापड मार्केट, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर व्यवसायांवर परिणाम झाला आहे. विशेष म्हणजे जिल्ह्याच्या विविध भागांत सध्या सुरू असलेल्या यात्रा-जत्रांमधील गर्दीही उष्णतेमुळे लक्षणीयरीत्या रोडावली आहे. दुपारी 12 ते संध्याकाळी 5 या वेळेत व्यापार अक्षरशः थंड असतो. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना दुपारच्या वेळी सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन केले आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा वापर काटकसरीने करण्याच्या सूचना नगरपालिका आणि ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत. वाढत्या उष्णतेमुळे पशुधनाचीही काळजी घेणे आवश्यक झाले असून, तशा सूचना जिल्हा प्रशासनाने तालुका पातळीवर निर्गमित केल्या आहेत.

### बेवारस वाहनांवर पोलिसांची कारवाई; 48 तासांत जप्तीची मोहीम सुरु

पुणे (दैनिक संध्या) : बेवारस वाहनांच्या बाबतीत वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांना देखील अशा बेवारस वाहनांची माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी केले असून, पीटीपी ॲपमध्ये माहिती नोंद होताच 48 तासांच्या आत पोलिस त्या वाहनांवर कारवाई करणार आहेत. तर दुसरीकडे पोलिसांकडून नोटीस दिल्यानंतर 24 तासांच्या आत वाहनमालकाला हे वाहन त्या जागेवरून हटवावे लागणार आहे. अन्यथा, पोलिसांकडून ते वाहन बेवारस घोषित करून जप्त केले जाईल. बुधवार (दि.15) पासून या मोहिमेला सुरुवात झाली आहे. शहरातील विविध भागांत रस्त्याच्या कडेला अनेक महिन्यांपासून उभी असलेली वाहने वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. तसेच, शहराच्या सुशोभीकरणास बाधा निर्माण होत आहे. त्यामुळे अशा वाहनांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी ही माहिती पत्रकाद्वारे दिली आहे. या मोहिमेअंतर्गत संशयित बेवारस वाहनांना प्रथम नोटीस देण्यात येणार आहे. नोटीस दिल्यानंतर पुढील 48 तासांच्या आत कारवाई सुरू केली जाईल. तसेच, वाहनमालकाने 24 तासांच्या आत वाहन हलवले नाही, तर ते वाहन ‘बेवारस’ घोषित करून जप्त करण्यात येईल. जप्त करण्यात आलेली वाहने महापालिकेच्या माध्यमातून दंड आकारल्यानंतरच परत दिली जाणार आहेत.

# कोरोनानंतर बर्ड फ्लूचा धोका? हवामान बदलामुळे संकट

## मानव-प्राणी संपर्क वाढल्याने धोका; नागरिकांनी सतर्क राहण्याचे तज्ज्ञांचे आवाहन

पुणे (दै. संध्या)

कोरोनानंतर आता बर्ड फ्लूच्या महामारीची शक्यता वर्तविली जात असून, प्राण्यांच्या संपर्कात असणाऱ्यांना बर्ड फ्ल्यू होऊ शकतो, असे बोलले जात आहे. जागतिक तापमानवाढीमुळे झालेल्या बदलांमुळे हे सर्व होत आहे.

अशा परिस्थितीत आपण प्रत्येकाने याबाबत जागरुक होणे आणि काळजी घेणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन पक्षितज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांनी बुधवारी (दि.15) केले. जंगलात पेटणाऱ्या बहुतांश वनव्यांमागे मानवी कारणे असल्याचेही त्यांनी नमूद केले. ॲडव्हेंचर फाउंडेशनच्या वतीने निसर्गप्रेमींसाठी आयोजित वसंत वैभव व्याख्यानमालेत डॉ. पांडे बोलत होते. वसंतातील पक्षिवैभव आणि पक्ष्यांमध्ये नवीनच आलेल्या बर्ड फ्लूवरील संशोधन या विषयावर त्यांनी स्लाईड शोद्वारे विचार मांडले.

जागतिक तापमानवाढीमुळे नैसर्गिक चक्रात झालेले बदल ते सद्य:स्थितीबद्दल, तसेच नॅशनल वन हेल्थ मिशनबद्दल त्यांनी माहिती दिली. आज जागतिक तापमानवाढीमुळे पृथ्वीवरील इकोसि स्टिम बदलले आहे. यामुळे प्राणी जंगलातून बाहेर येतात आणि त्यामुळे माणसाशी त्यांच्याशी संपर्क वाढत आहे. आताच्या घडीला पक्ष्यांमध्येही अनेक आजार दिसून येत



आहेत. अशा वेळी आम्ही बर्ड फ्लूबाबत संशोधन करीत आहोत, जागरुकता निर्माण करीत आहोत, असेही त्यांनी सांगितले.

**जागतिक तापमानवाढीमुळे नैसर्गिक चक्र बदलले :**

वसंत ऋतू हा रंगांचा ऋतू आहे. या ऋतूत सगळीकडे वेगवेगळे रंग पाहायला मिळतात. प्रत्येक झाडावर पक्षी येऊन बसतात. हे दृश्य पाहण्यासारखे असते. पण, आज जागतिक तापमानवाढीमुळे नैसर्गिक चक्र बदलले आहे.

फुलांचा तो रंग, स्थलांतरित पक्ष्यांचे भारतातील प्रवासाचे चक्र सर्व काही बदलत चालले असून, अवेळी येणारा पाऊस, पाण्याची कमतरता असे चित्र पाहायला मिळत आहे. आजच्या परिस्थितीत जागतिक तापमानवाढीमुळे जगभरात जंगल नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे जीव जात आहेत. हे चित्र भारतातही पाहायला मिळत आहे. या बदलांबाबत लोकांनी जागरुक झाले पाहिजे, असे डॉ. पांडे म्हणाले.

# पाषाणमध्ये डीआरडीओ परिसरात अनधिकृत शोरूम

## 500 मीटर प्रतिबंधित क्षेत्रात पुन्हा उभारली दुकाने; कारवाईसाठी महापालिकेची कोर्टात धाव

पाषाण (दै. संध्या)

पाषाण परिसरातील सुतारवाडीमध्ये मुंबई-पुणे महामार्गालगत डीआरडीओच्या एचईएमआरएल या प्रयोगशाळेच्या 500 मीटर परिघात कोणतीही बांधकामे करण्यास व दुकाने उभारण्यास मनाई असताना देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत फर्निचर शोरूमची दुकाने थाटण्यात आली आहेत. येथे कारवाई केल्यावर न्यायालयाने ‘जैसे थे’चे आदेश देऊनही या आदेशाची पायमल्ली करून पुन्हा दुकाने थाटली आहेत.

या दुकानांविरोधात कारवाई करण्यासाठी महापालिकेने कोर्टात याचिका दाखल करत कारवाई करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी केली आहे. डीआरडीओच्या एचईएमआरएल या प्रयोगशाळेच्या 500 मीटर प्रतिबंधित क्षेत्रात उभारलेल्या 25 शोरूम दुकानांवर 1 मार्च




2024 रोजी महापालिकेने कारवाई करत येथील 3 लाख चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकाम हटवले होते. त्यानंतर येथील शोरूम मालकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ‘जैसे थे’ स्थिती कायम ठेवण्याचा आदेश दिला होता. तसेच, जर बांधकाम आधीच पाडण्यात आले असेल, तर त्या ठिकाणी कोणतेही नवे बांधकाम किंवा बदल करू नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले होते.

मात्र, या आदेशाचे उल्लंघन करत पुन्हा दुकाने थाटली आहेत. महापालिकेच्या पाहणीदरम्यान संबंधितांनी पुन्हा नूतनीकरण करून त्या ठिकाणी दुकाने थाटल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाल्याचा आरोप प्रशासनाकडून करण्यात आला आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कारवाईसाठी पथक घटनास्थळी गेले असता संबंधितांकडून न्यायालयीन मनाई आदेश दाखवून कारवाई रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे पुढील कारवाईला अडथळे निर्माण होत आहेत.

एचईएमआरएलच्या 500 मीटर क्षेत्रात सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी नसतानाही मोठ्या प्रमाणात शोरूम व हॉटेल उभारण्यात आली आहे. पाषाण सुतारवाडी येथील महामार्गालगत असलेल्या या फर्निचर शोरूमवर 2024 मध्ये कारवाई करण्यात आली होती. ही कारवाई करताना त्या वेळी एका बड्या अधिकाऱ्याने फोन करत कारवाई थांबविण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे ही कारवाई अपूर्ण राहिली, अशी माहिती महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

# पुण्यात CBSE दहावीचा 100% निकाल; विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

पुणे (दै. संध्या)

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) जाहीर केलेल्या दहावीच्या निकालात शहरातील शाळांनी दमदार कामगिरी केली. बहुतांश शाळांचा निकाल 100 टक्के लागला असून, अनेक विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांहून अधिक गुण मिळवत यश संपादन केले.

सीबीएसईने जाहीर केलेल्या निकालात महाराष्ट्राचा समावेश असलेल्या पुणे विभागाचा निकाल 96.66 टक्के लागला. देशात पुणे विभाग सातव्या स्थानी आहे. त्रिवेंद्रम विभागाचा निकाल सर्वाधिक 99.79 टक्के लागला. पुणे विभागातील 1 हजार 496 शाळांतील एकण 1 लाख 33 हजार 663 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यात 75 हजार 940 मुले, 57 हजार 723 मुलींचा समावेश होता. त्यातील 75 हजार 771 मुले, 57 हजार 661 मुली असे एकूण 1 लाख 33 हजार 382 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी 72 हजार 848 मुले, 56 हजार 85 मुली असे एकूण 1 लाख 28 हजार 933 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ज्ञानप्रबोधिनी प्रशालेतील सर्व 80 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेचा सरासरी निकाल 90.5 टक्के लागला. अथर्व भिडे याने 98 टक्क्यांसह प्रथम क्रमांक मिळवला. प्रशालेतील 25 विद्यार्थ्यांना 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले. 29 विद्यार्थ्यांनी संस्कृतमध्ये पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले.

बावधन येथील रायन इंटरनॅशनल ॲकॅडमीचा निकाल 100 टक्के लागला. रितिका रेओसेकरने 96.8 टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. वडगाव बुद्रुक येथील हेलिओस इंटरनॅशनल स्कूलच्या दहावीच्या पहिल्याच तुकडीचा निकाल 100 टक्के लागला. अंजली सरगंडलाने 96.8 टक्क्यांसह प्रथम, युग बोराने 95.8 टक्क्यांसह द्वितीय क्रमांक मिळवला.

# अळकुटी रानमळा येथे चोरट्यांचा धुमाकूळ; वृद्ध महिलेला मारहाण

आळेफाटा (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील बेल्हे आळकुटी रोडवरील रानमळा येथे अज्ञात चोरट्यांनी गुरूवारी मध्यरात्रीनंतर धुमाकूळ घातला. बेल्हे आळकुटी रोडवरील रानमाळा येथे चोरट्यांनी ८५ वर्षीय वृद्ध महिलेस मारहाण करत अंदाजे 5 हजार रुपये व एक तोळा सोन्याचे दागिने लुटून नेले. प्रतिकार करताना या महिला जखमी झाल्या आहेत.

जिजाबाई गबाजी गुंजाळ (वय 85) असे जखमी वृध्द महिलेचे नाव आहे. याबाबत माहिती अशी की बेल्हे आळकुटी रोडवरील रानमळा येथे अज्ञात चोरट्यांनी बुधवारी मध्यरात्रीनंतर ते गुरुवारी पहाटेपूर्वी धुमाकूळ घातला. त्यांचा तीन ठिकाणी चोरीचा प्रयत्न अयशस्वी झाला. यानंतर ते घरात एकटाच राहत असलेल्या जिजाबाई गुंजाळ यांच्या घराकडे आले. त्यावेळेस त्या शौचालयात बाहेर गेल्या होत्या. चोरट्याने त्यांना लोखंडी गजाने त्यांच्या डोक्यावर हातावर मारहाण करत जखमी करून त्यांच्या गळ्यातून दागिने काढून घेतले.

# पिंगोरीच्या जय गणेश जलाशयात ३० टक्के पाणीसाठा

पिंगोरी (दै. संध्या)

पिंगोरी परिसराला सुजलाम् सुफलाम् करणाऱ्या येथील 'जय गणेश जलाशयात' १४ एप्रिल अखेर तीस टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती गराडे पाटबंधारे विभागाचे शाखाधिकारी अविनाश जगताप यांनी दिली.

सन,१९७२ मध्ये या तलावाची निर्मिती करण्यात आली होती तेव्हापासून पिंगोरीतील शेतीसह,पिण्याच्या पाण्यासाठी हा जलाशय वरदान



ठरला आहे;या जलाशयामुळे, पिंगोरी परिसरातील बागायत शेतीचे क्षेत्र वाढले आहे.मागील काही वर्षांपूर्वी अल्प पर्जन्यमान झाल्याने जय गणेश जलाशय पुर्ण क्षमतेने भरला नव्हता. त्यामुळे ऐन पावसाळ्यात देखील पिंगोरी गावाला पाण्याचा सामना करावा लागला होता मात्र गतवर्षी मान्सूनपूर्व पावसाने समाधानकारक हजेरी लावल्याने जून महिन्यातच जय गणेश जलाशय ओसांडून वाहू लागल्यानंतर,येथील ग्रामस्थांच्या वतीने, मोठ्या उत्साहात जलपूजन करण्यात आले होते.

परंतु सद्य स्थितीत कडक उन्हाळा असताना देखील या जलाशयात ६.० दशलक्ष घनफुट म्हणजेच सरासरी ३० टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# एकल महिलांसाठी जिल्हा परिषदेचा 'माझे अस्तित्व' महत्वाकांक्षी प्रकल्प

## जिल्ह्यात १२० शिबीराचे आयोजन; ७० हजाराहून अधिक एकल महिला सहभागी

पुणे (दै. संध्या)

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून एकल महिलांसाठी 'माझे अस्तित्व' महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) आनंद खंडागळे यांनी दिली आहे.

या प्रकल्पाकरिता माहे ऑगस्ट २०२५ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये 1 लाख 9 हजार महिलांना सहभाग नोंदविला. एकल महिलासांठी महसूल मंडलनिहाय आयोजित एकूण १२० शिबीरात ७० हजार



५५८ एकल महिला सहभागी झाल्या होत्या. शासकीय योजनासाठी आवश्यक कागदपत्रे मिळवून देणे, शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती व लाभ देणे, आरोग्य तपासणी करणे, आवश्यक आरोग्य सुविधा पुरविणे, संदर्भ सेवा देणे आदी सेवा देण्यात आल्या.

बंधन व आयटीसी एनजीओमार्फत शिरुर तालुक्यात एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे यशस्वी कामकाज केले आहे. आजअखेर ६०० एकल महिलांना विविध प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. एकल महिलांना व्यवसायाच्यादृष्टीने आवश्यक साहित्याचा विनामूल्य पुरवठा करण्यात आला. त्यामध्ये भाजीपाला, फळे विक्री, शिवणकाम यासारख्या व्यवसायाचा समावेश आहे. व्यवसायाकरिता प्रत्येक एकल महिलेला व्यवसायाबाबतचे सहा महिने प्रशिक्षण देऊन देण्यात आले आणि यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केल्याचबाबतचे प्रमाणपत्र व व्यवसाय सुरु करणेसाठी कच्च्या मालाचा पुरवठा आदी बंधन व आयटीसी कंपनीच्या सीएसआर निधीतून देण्यात येत आहे.

'माझे अस्तित्व' योजना अंतर्गत जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात ३ ,बारामती ६, भोर ९, दौंड १६ , हवेली ९, इंदापूर ६, जुन्नर ७, खेड १५, मावळ २२, मुळशी ११, पुरंदर ८, शिरुर ५, आणि वेल्हे तालुक्यात ३ याप्रमाणे १२० शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील तसेच महिला बालकल्याण सभापती अंकिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकल महिला उपक्रम जिल्हा परिषदमार्फत आता अधिक प्रभावीपणे राबवण्याचे नियोजन केलेले असून याकरिता जिल्हा पातळीवर एकल महिलांकरता पोर्टल तयार करण्यात येऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी व पाठपुरावा प्रत्येक लाभार्थ्याचा करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री. खंडागळे यांनी दिली आहे.